# सुगी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
२१६५




REFBK-0019893

काव्य
२१६५

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र ग्रंथ
वि. काव्य क्र. ९०.६५
ता. २८-१२-३३
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र. ६८३८
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १६८९३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
सं. काव्य २१६५

# सुगी

## जानपदगीतांचा प्रातिनिधीक संग्रह

—o—

संग्राहक

गजानन लक्ष्मण ठोकळ

REFBK-0019893

प्रस्तावना लेखक

विष्णु सखाराम खांडेकर

—

१९३३

१ रुपया

प्रकाशक
गजानन लक्ष्मण ठोकळ
जंबुबेट, बडोदें

( सर्व हक्क संग्राहकाचे स्वाधीन )

मुद्रक
श्रीनिवास केशव चित्रे
आत्माराम प्रेस, बडोदें

काव्य
२१६५

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | अगोदर | संपादकीय | ७ |
| | वानगी | प्रस्तावना | ९ ते २४ |

भाग १ ला.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उघडें गुपित् | चंद्रशेखर | १ |
| २ | लेजिम | श्री. बा. रानडे | १७ |
| ३ | सुखाचे क्षण | बा. भ. बोरकर | १८ |
| ४ | खेड्यांतील घराकडे | वा. भा. पाठक | २० |
| ५ | खेडेगावांतील सकाळ | द. ग. जयवंत | २३ |
| ६ | ' हिंगणी ' एक ओसाड खेडें | ग. ह. पाटील | २५ |
| ७ | कापसाचें शेत | किशोर | २८ |
| ८ | भाताच्या मळयांत | वि. स. खांडेकर | २९ |
| ९ | उंसांच्या मळयांत | भ. श्री. पंडित | ३० |
| १० | मळयांत जातांना | सो. चौधरी | ३१ |
| ११ | कुणब्यांची राणी | कु. गायकवाड | ३६ |
| १२ | शेवंती | ग. ह. पाटील | ३७ |
| १३ | मंजुळा | काव्यविहारी | ३८ |
| १४ | ही कोण ? | वि. भि. कोलते | ४० |
| १५ | इरलेवाली | वा. गो. मायदेव | ४१ |
| १६ | सुंदरी | वा. गो. मायदेव | ४३ |
| १७ | मोटेवरील सुंदरी | राजस | ४४ |
| १८ | गुराखीण | आनंद | ४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | पेटीवाली | पां. जि. सबनीस | ४७ |
| २० | गोपाळ | आनंद | ४९ |
| २१ | संध्याकाळीं | काव्यविहारी | ५० |
| २२ | रायबा | गोपीनाथ | ५२ |
| २३ | तीन बालमित्र | वा. भा. पाठक | ५४ |
| २४ | विरोध | अविनाशचंद्र | ५५ |
| २५ | आजचा मराठा | अज्ञातवासी | ५७ |


## भाग २ रा.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुगी | ना. घ. देशपांडे | ५९ |
| २ | सुगी | सुरेश | ६० |
| ३ | सुखी जीव | राजा बढे | ६२ |
| ४ | समाधान | ना. घ. देशपांडे | ६४ |
| ५ | अशी तर जंगलचीं पांखरें | पां. श्री. गोरे | ६५ |
| ६ | आगोट | वि. म. घुले | ६७ |
| ७ | पावसाचें गीत | आनंद | ६८ |
| ८ | पेरणीसाठीं | वि. भि. कोलते | ६९ |
| ९ | पेरनीचा होका | सो. चौधरी | ७० |
| १० | निंदणी | भ. श्री. पंडित | ७२ |
| ११ | भलेरी | गिरीश | ७३ |
| १२ | इर्जिक | वि. म घुले | ७४ |
| १३ | गोफणवाला | सुरेश | ७६ |
| १४ | मोटकरी | ना. घ देशपांडे | ७८ |
| १५ | मोळीवाला | सुरेश | ८० |
| १६ | फेरफटका | सुरेश | ८१ |
| १७ | गरिबीचा पाहुणचार | ग. [illegible] ठोकळ | ८२ |
| १८ | उंद्या येदाळा | स घु [illegible] | ८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | लुटारूनीं म्हटलेलें गाणें | ग. ह. पाटील | ८६ |
| २० | कोंकणचा शेतकरी | आनंद | ८७ |
| २१ | कोंकणचा कुळवाडी | चक्रवाक् | ८९ |
| २२ | पाह्मलं ग दारीं | सो. चौधरी | ९१ |
| २३ | भिंगरी | ना. घ. देशपांडे | ९३ |
| २४ | गुजगोष्टि करूं कानांत | कु. कमलाग्रज | ९४ |
| २५ | गरिबीचा सौंसार | ग. ल. ठोकळ | ९५ |
| २६ | कोळ्याचें गाणें | अनंत काणेकर | ९६ |
| २७ | लक्षुमी | ग. ल. ठोकळ | ९८ |
| २८ | कारभारणीस | आनंद | ९९ |
| २९ | शीळ | ना. घ. देशपांडे | ९९ |
| ३० | विनवणी | शं. अगरवाल | १०० |
| ३१ | रावणी | भ. श्री. पंडित | १०२ |
| ३२ | जात्यावरलं गाणं | ग. ल. ठोकळ | १०३ |
| ३३ | आठवण | शांतादेवी परदेशी | १०४ |
| ३४ | रामपहारीं | ना. घ. देशपांडे | ९९ |
| ३५ | घरधनी | ग. ल. ठोकळ | १०६ |
| ३६ | खोळंबा | पां. श्रा. गोरे | १०७ |
| ३७ | न्याहारीचें गाणें | यशवंत | १०९ |
| ३८ | लवतेया लवलव ईज ! | भ. श्री. पंडित | ११० |
| ३९ | घर | यशवंत | १११ |
| ४० | पाटलाची सून | अशोक | ११२ |
| ४१ | मागणी | सुरेश | ११३ |
| ४२ | पायगुणी | फकीर | ११५ |
| ४३ | भडिमार | साधुदास | ११३ |
| ४४ | नजर | अशोक | ११८ |

श्री. ग. ल. ठोकळ

यांच्या निवडक कवितांचा संग्रह

# मीठभाकरी

लवकरच प्रसिद्ध होईल.

१०८४
2-92-33

संग्रहाचे एकंदर दोन भाग केले आहेत. कविश्रेष्ठ चंद्रशेखरांच्या 'उगडें गुपित्' या खंडकाव्यापासून पहिल्या भागाला सुरवात होते. या भागांत वर्णनपर ( narrative ) कवितांचा समावेश केला आहे. श्री. अज्ञातवासींच्या 'आजचा मराठा' या कवितेपाशीं ह्मणजे ५८ पानावर या भाग संपतो. श्री. ना. घ. देशपांडे यांच्या 'सुगी' या कवितेनें दुसऱ्या भागाचा आरंभ होतो. या भागांत खेडवळ लोकांच्या तोंडीं घातलेलीं, अर्थात् खेडवळ भाषेंत लिहिलेलीं गीतें ( Dramatic songs ) आहेत. कवितांचा अनुक्रम सारखेपणाच्या दृष्टीनें लावला आहे. वर्णनांत, विषयांत अगर भूमिकेंत साम्य असणाऱ्या कविता ह्यारीनें वाचावयास मिळतील.

अगदीं ओळखीच्या, नेहमींच्या चाली कवितांच्या डोक्यावर बसलेल्या पहायला मला स्वतांला मुळींच आवडत नाहीं, तरूण विद्यार्थ्यांच्या डोक्यावर टोपी ज्या प्रमाणानें क्वचित् दिसते त्याच प्रमाणांत मी कवितांच्या डोक्यावर चालींचीं नांवें ठेवलीं आहेत. अगदीं ओळखूं न येणाऱ्या चालींचाच तेवढा उल्लेख केला आहे. दुर्बोध शब्दांच्या टिपा मात्र जरूर त्या ठिकाणीं दिल्या आहेत.

मि. सोपानदेव चौधरी यांची 'पेरनीचा होका' ही कविता लेवापाटीदार भाषेंत, मि. सुरेश यांची 'मागणी' ही ऐरणी भाषेंत, व मि. चक्रवक् यांची 'कोंकणचा कुळवाडी' ही कोंकणी भाषेंत, लिहिलेल्या असल्यामुळें, त्यांना मात्र भरपूर टिपा दिल्या आहेत. या तिन्ही कविता वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळें वाचकांनीं टिपा नीट वाचव्यात ह्मणजे कवितांची गोडी प्रत्ययाला येईल.

खेडवळ भाषेंतले accents अनुस्वारानें दाखविण्याची पद्धत वाचकाला घोटाळ्यांत पाडणारी असल्यामुळें, ज्या ठिकाणीं अक्षर लघु असून त्याचा उच्चार दोन मात्रांचा करायाचा असतो त्या अक्षराच्या डोक्यावर गुरुत्वदर्शी आडवी रेघ संग्रहामधें सर्हा वापरली आहे.

१९८०३

ह्या संग्रहासाठीं ज्या ज्या कवींनीं आपापल्या कविता मला दिल्या त्यांचे आभार मानणें अत्यंत जरूरीचें आहे. त्यांच्या मदती शिवाय संग्रहाला सुरवातही करतां आली नसती.

उन्हाळ्याच्या दिवसांत आणि तेही बडोद्यासारख्या ठिकाणीं, प्रकृति चांगली नसतांना सुद्धां राजकवि चंद्रशेखर यांनीं, मी शब्द टाकतांच मला 'उगडें गुपित्' लिहून दिलें, याबद्दलची कृतज्ञता मला 'गुपित' ठेवायची असतांना सुद्धां ठेवतां आली नाहीं. श्री. खांडेकरांचेंही ही अगदीं तसेंच. अगोदरच त्यांची प्रकृति अशितशीच, आणि त्यांत फुरसें चावलेलें; अंथुरणावर पडल्या पडल्या त्यांनीं मला ही सुंदर प्रस्तावना लिहून दिली. कोणत्या शब्दांनीं त्यांचे आभार मानूं

येथील कर्मसचीव मे. माने पाटील व श्री. जोशी यांनीं लिहून दिलेल्या 'चार शब्दां' बद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

येथील श्रीमति घाटेबाई यांनीं काढून दिलेल्या वेष्टणावरल्या व आंतल्या दोन्ही चित्रांबद्दल, त्याचप्रमाणें मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. आंबेरकर यांच्या 'पिकला आंबा तूं चाखित' या चित्राबद्दल, मी या दोघांहि चित्रकारांचा फार फार आभारी आहे.

मुंबईचे हौशी प्रकाशक श्री. बापूसाहेब कोल्हाटकर यांनीं 'सुगी' चे गेट अप् सुंदर करण्यासाठीं मला जी मदत केली तिचा निर्देश केल्याशिवाय मला राहवत नाहीं.

शेवटीं, गु. टेंभुर्णीकर व मि. ग. ह. पाटील यांच्या प्रोत्साहनाशिवाय व मदतीशिवाय मला 'सुगी' साधतां आली नसती एवढें सांगितलें ह्मणजे पुरे आहे.

मराठी भाषेंतला जानपदगीतांचा हा पहिलाच संग्रह वाचक गोड करून घेतील अशी मी आशा करतों.

जंबुबेट, बडोदें.
१२-१२-३३

ग. ल. ठोकळ

# वानगी

श्री. ठोकळ यांनीं 'सुगी'ला प्रस्तावना लिहिण्याच्या कामीं माझी योजना कां केली याचें माझ्याप्रमाणें अनेकांना कोडेंच पडेल. वाचकांकडून पैसे घेऊन हें कोडें सोडविण्याकरितां बक्षीस लावण्याची शक्यता नसल्यामुळें मीच तें उलगडण्याचा प्रयत्न करतों. काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहायला अधिकारी पुरुष, उत्कृष्ट कवि हाच होय. त्या दृष्टीनें पाहिल्यास, उद्यां एखाद्या मराठी विनोदी लेखकाला औट घटकेचें राज्य मिळून त्यानें आपल्या काव्यपीनलकोडाप्रमाणें शिक्षा फर्मावल्या तर (अहिनकुल, इळाभोपळा, हे जुने स्नेही सोडाच, पण अत्रे-वरेरकर अगर अलमगीर-भोपटकर या अधुनिक जीवश्चकंठश्च (!) मित्रांना लाजविण्याइतके मराठी विनोदी लेखक व कवि यांचें रहस्य आहे हें काय सांगायाला पाहिजे?) माझ्या अनेक कविमित्रांना फांशी अगर जन्मठेप मिळेल, पण माझी मात्र थोड्याशा दंडावर सुटका होईल अशी माझी खात्री आहे. (फांशीची शिक्षा झालेल्या कवि-मित्रांवर नवीन कविता लिहून दंड वाढवून घेण्याइतका मी वेडाही नाहीं.) माझी कविता वाचतांना जांभया येऊं लागतात असें नुकेंच माझ्या एका चहात्याचें मत मी वाचलें. सध्यां निद्रानाशाच्या रोगाचें प्रमाण वाढत आहे असें ह्मणतात. अशावेळीं माझा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला तर तो निश्चित खपेल, काव्यानंद नसला तरी निद्रानंद तो देऊं शकेल, या कल्पनेनें मी तो प्रसिद्ध करून त्याला प्रस्तावना जोडली असती तर तें योग्य झालें असतें! पण ही प्रस्तावना—

वहिवाट अगर रसिकता या दृष्टीनेंही ही प्रस्तावना लिहिण्याचा हक्क मला पोंचत नाहीं. बी कवींनीं महाराष्ट्रकवींच्या परंपरेला अद्यापि खंड पडला नाहीं अशी ग्वाही एका कवितेंत दिली आहे. पण महाराष्ट्रांतले प्रस्तावनाकारही या बाबतींत कवींना हार जाणार नाहींत. दुर्दैवानें मी मात्र या परंपरेतला नाहीं. रसिकतेची गोष्टही थोडीशी तशीच आहे. तिखट टीकाकार ह्मणून

ज्याची प्रसिद्धी, त्याच्या अंगीं प्रस्तावनाला साजेल अशी गोडगुलाबी कुठून असणार ? त्याच्याकडे ही कामगिरी द्यायची ह्मणजे कुत्रें इमानी आहे ह्मणून सरस्वतीच्या वाहनाच्या जागीं त्याची नेमणूक करण्यापैकींच प्रकार व्हायचा ! व्हायचा कसला ? झालाच आहे ह्मणा ! या बनावाची मुख्य कारणें दोन आहेत. पहिलें—ठोकळ कवि आहेत. या संग्रहांतील पृ. ८३ वरील त्यांच्या कवितेंतील गरीब यजमान अपरिचित पाहुण्याची यथास्थित उठाबस करून ह्मणतो—

“ जायचें ” काय म्हंगता ? झोंप घ्या जरा
जाताल उद्यां कां घाई ? छे: वेत नव्हे हा बरा ! ”

अनोळखी पाहुणा लफंगा असेल हा विचार ज्याच्या काव्यनायकाच्या मनाला शिवतसुद्धां नाहीं, तो प्रेमळ कवि प्रस्तावनाकार निवडतांना फसावा यांत नवल तें कसलें ? दुसरें कारण—कुणी बादरायणसंबंध ह्मणो हवें तर त्याला—हा खेडवळ कवितांचा संग्रह आहे आणि मीही खेडवळ आहें. ‘ समसमा संयोग कीं जाहला ! ’ या कविवचनाच्या आधारावरच मी हें धाडस करण्याला प्रवृत्त झालों.

‘ खेडवळ कविता ’ ! या संग्रहांतील कवींपैकीं एखादा तापट कलावंत “ खेडवळ शब्द योजल्याबद्दल तुमच्यावर देअब्रूची फिर्याद कां करूं नये ? ” ह्मणून मला नोटीस देण्याची कल्पनासुद्धां मनांत आणील. त्याच्या समाधानाकरितां मी एवढेंच ह्मणेन, “ हे कलावंत कविबंधो, खेडवळ या शब्दानें तुझ्या कवितेचा विरस करण्याऐवजीं जानपद अगर त्यापेक्षांही अधिक कठिण असा एखादा संस्कृत शब्द वापरावा असें मला सुद्धां वाटतें. पण हुंड्याच्या मानानें करणी आणि करणीच्या मानानें दिवाळसण केल्याशिवाय व्यवहारांत चालत नाहीं. ‘ जानपद ’ शब्द वापरून त्याच्याच तोलाचे ‘ प्रथितयश ’ सारखे संस्कृत शब्द मी त्याच्या शेजारीं बसविले कीं माझी भाषाशैली पाहून तूं विसाव्या शतकांतून माझी उचलबांगडी करशील. पण अठराव्या शतकांतील मोरोपंतांचा मित्र होण्याची कांहीं माझी इच्छा नाहीं.

तेव्हां आतां आपण तडजोड करूं या. आमच्या कोंकणांत ‘ मासळी काय आणली आहेत ? ’ असें विचारण्याऐवजीं ‘ काय बाजार हाडलांत् ? ’ असा प्रश्न करतात. ज्या कारणाकरितां मासळीचें नामांतर ‘ बाजारा’त होतें, त्याच कारणाकरितां खेडवळ शद्ब बदलला पाहिजे असें तुला वाटत असेल, तर आपण खेडवळ कवितेला ग्रामगीतें ह्मणूं या. ”

‘ पॅस्टोरल पोएट्री ’ या शद्बावरून सुचलेलें गोपगीतें, किसानगीतें वगैरे शद्ब याच अर्थी क्वचित् वापरण्यांत येतात. परंतु या सर्व शद्बांत अव्याप्तीचा दोष आहे. गोपगीतांत कोळयाच्या गाण्यांचा समावेश करणें हें मराठ्यांत मुसलमान बेमालूम मिसळून देण्याइतकेंच कठिण आहे. ‘ कोळी हा एक प्रकारचा गुराखीच असतो; होड्या हीं त्याचीं गुरें, समुद्र हें त्याचें रान—’ अशी मल्लिनाथी या आक्षेपावर होण्याचा संभव आहे. पण होडिला सिंहासन ह्मटल्यामुळें कोळी जसा राजा ठरूं शकत नाहीं, त्याप्रमाणें असल्या ओढून ताणून आणलेल्या साम्यामुळें गाबीत कांहीं गुराखी होत नाहीं—किसानगीतांत फक्त शेतकऱ्यांविषयींच्या कवितांचाच समावेश होईल. जानपद गीतें अगर ग्राम्यगीतें ह्यांच्या ऐवजीं हा शद्ब रूढ झाल्यास ब्राह्मग ह्मणवून घेण्याच्या भरांत अनेक जातींनीं जशीं लोकविलक्षण नांवें धारण केलीं, त्याप्रमाणें कोळयाच्या गाण्यांना अतिशद्ब ह्मणून ‘ सागर किसान गीतें ’ असले शद्ब जन्माला येतील. रोग, संकटें आणि वाईट शद्ब यांच्याशीं झुंजत बसण्यापेक्षां त्यांचा जन्मच न होऊं देणें बरें नाहीं का ?

खेड्यांविषयींची कविता ह्मटली कीं अनेकांचीं तोंडें विश्वरूपदर्शन घेणाऱ्या अर्जुनाच्याप्रमाणें होतात. फरक इतकाच कीं, अर्जुनाला कृष्णाच्या तोंडांत नाहीं नाहीं ते दिसलें; आणि या श्रोत्यांना खेड्यांत जें आहे तें सुद्धां दिसत नाहीं ! टर्जीनिवनें आपल्या Virgin Soil या कादंबरींत एका पांढरपेशा लब्धप्रतिष्ठिताचें मोठें गंमतीदार चित्र रेखाटलें आहे. स्वारीची मातृ भाषा रशियन. पण निम्मेतरी फ्रेंच शद्ब वापरल्याखेरीज त्यांचें वाक्य पुरेंच होत नाहीं. या भाषेच्या खिचडीहूनही त्याचीं मुक्ताफळें अधिक मौजेचीं आहेत.

रशियन कादंबऱ्या शपथेला देखील न वाचण्याचें कारण सांगतांना तो नाक मुरडून ह्मणतो " छी ! या अलीकडच्या रशियन कादंबऱ्या ! रांडविणीला नायिका करून लिहिलेल्या या भाकडकथा कोण वाचणार ? " नोकरी मिळायला जशी विशिष्ट परीक्षा पदरीं असावी लागते त्याप्रमाणें वाङ्मयांत नायक-नायिकेचें स्थान लाभायला उच्च कुळच हवें असें या सद्गृहस्थांचें ठाम मत असतें. जणुं कांहीं नायक–नायिकांचें स्थान ह्मणजे राजपदच. तें वंशपरंपरेनेंच चालायचें !

स्वयंपाकीण ही फक्त चुलीजवळील साहित्याची नायिका होऊं शकते असें ह्मणणाऱ्या वरील गृहस्थाचें आमच्यापैकीं अनेकांना हंसूं येईल. पण आमच्या पायाखालीं तरी काय जळत आहे ? हरिभाऊ आपट्यांसारखा सागराएवढी अफाट सहानुभूति असलेला प्रतिभासंपन्न कादंबरीकार ! पण त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांतील सारीं पात्रें सदाशिव पेठेंतल्या हौदाभोंवतीं फिरणारीं ! फार लांबची मजल मारली तर ती वंडगार्डनपर्यंत पोंचायचीं ! खेड्यांतल्या खळखळणाऱ्या ओढ्याच्या कांठीं त्यांच्यापैकीं कोण कशाला जाणार ? कोल्हटकर गडकरी–वा. म. जोशी–फडके ह्यांच्या सामाजिक नाटकें कादंबऱ्यांकडे पहावें ! हरिभाऊंचें वाङ्मय निदान चंद्रकांतासारखें आहे. दलितांच्या दर्शनानें त्याला पाझर फुटलेला स्पष्ट दिसतो. पण बाकीच्या साऱ्या कल्पनाप्रिय, तात्विक अगर कलाविलासी ग्रंथकारांचें वाङ्मय ह्मणजे शुद्ध संगमरवर ! दिसायला किती नितळ अन् सुंदर ! पण खेड्यांत संगमरवर जितका दुर्मिळ तितकेंच दलितांचें अगर खेडवळांचें जीवन यांच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेलं दिसणेंही कठिण ! गडकऱ्यांच्या लोकप्रिय 'एकच प्याल्या' चीच गोष्ट घ्या ! दारूचा प्याला हा स्थितप्रज्ञ आहे. त्याला सुशिक्षित सुधाकर काय आणि अशिक्षित गिरणींतला मजूर काय दोन्ही सारखेच ! परंतु गडकऱ्यांनीं नायक ह्मणून दूरच राहो, पण दुसऱ्या तिसऱ्या दर्जाच्या पात्रांच्या द्वारानेंसुद्धां खेडवळांवर दारूचे होणारे दुष्परिणाम चित्रित केले नाहींत. या नामांकित ग्रंथकारांनीं समाजचित्रण करितां संकुचित क्षेत्राबाहेर पाऊल कां टाकलें नाहीं, याचीं

जातिभेद, काल-महात्म्य, संस्कृतिभिन्नत्व इत्यादि अनेक कारणें असूं शकतील. पण मराठींतील अद्भुतरम्य, कल्पनानिष्ठ आणि प्रणयप्रधान वाङ्मयाला आमच्या खेडेगांवांची हवा — ती एरवी किती चांगली असली तरी अद्यापि मानवत नाहीं हेंच खरें. प्रख्यात इंग्लिश कादंबरीकार हार्डी काय कमी सौन्दर्यवादी आहे? पण त्याच्या कादंबऱ्यांतून खेडवळांचें जीवन किती कुशलतेनें रंगविलेलें दिसतें. नाटककाराच्या बाबतींतलें आणखी एक कारण म्हणजे त्याची सासूबाई—नाटक मंडळी! स्त्रीला सासू असणें जितकें अनिष्ट तितकेंच तें पुरुषाला इष्ट, अशी आपल्याकडे जुनीपुराणी समजूत आहे. पण नाटककाराला ती सपशेल खोटी असल्याचा अनेकदां अनुभव येतो. चांभारणीवर उभारलेलें नाट्यकथानक एका मंडळींच्या मालकांना मी सांगितल्यावर ते म्हणाले "बाकी कथानक ठीक आहे. पण अं—अं—ही नायिका चांभारीण आहे. छेः बुवा! निदान तिला मराठीण तरी करा." मालकांचा उद्देश हरिजनांच्या उन्नतीचा नव्हता! शिवाय युरोपियन बाईला चुटकीसरशीं हिंदू करून घेणाऱ्या शंकराचार्यांच्या हाताखालीं माझें शिक्षणही झालेलें नाहीं. तेव्हां चांभारणीला मराठीण करून नाटकाच्या कथानकाचा कणाच मोडून टाकण्याचा राजमार्ग मी स्वीकारला नाहीं ही गोष्ट निराळी!

जातिभेद मोडण्याच्या गोष्टी बोलणाऱ्या लेखकांनीं वाङ्मयांत नागर व खेडवळ हा भेद तीव्रतेनें पाळावा हें विलक्षण विरोधाभासाचें उदाहरणच नव्हे काय? हिंदु-मुसलमानांच्या एकीवर आणि विवाहावर आम्ही कादंबऱ्या लिहूं; पण खेड्यांतल्या कुणब्यांच्या भाऊबंदकीवर अगर जीवनावर लिहायची पाळी आली कीं आमची लेखणी रुसून बसलीच! खेड्यांतल्या लोकांचा आमच्या ललित वाङ्मयांत प्रवेश झालाच तर तो त्यांचा भोळेपणा अगर अडाणीपणा दाखवून विनोदाला रंग भरण्याकरितांच व्हायचा! ब्राम्हण भिक्षुक किंवा शास्त्री दुष्ट अगर मूर्ख या भूमिकेंत मराठी वाङ्मयांत कितीदां अवतीर्ण झाला असेल याची गणतीच करतां येणार नाहीं. पण याच पेशांतल्या किती तरी माणसांत वर्णनीय औदार्य आणि सहृदयता वसत असते! अनेकांना आश्चर्य वाटेल,

पण अगदीं खरीखुरी घडलेली गोष्ट आहे ! कीर्तनांत सामान्यतः सुधारकां विरुद्ध बोलणाऱ्या आणि कट्टर सनातनी गणल्या जाणाऱ्या एका प्रख्यात ह. भ. प. ( पांगारकरांनीं या शब्दाचें पेटंट घेतलें असल्यास त्यांची मी क्षमा मागतों ) बुवांनीं एका बालविधवेचा पुनर्विवाह मोठ्या खटपटीनें जुळवून आणला. अशा मनुष्याचें स्वभावचित्र रेखाटण्याची इच्छा आमच्या लेखकांत तीव्रतेनें कुठें वास करीत आहे ?

'गातां येईना, सतार मोडकी अन् साथ रडकी' अशापैकींही अनेकांचा प्रकार असतो. 'आम्ही खालच्या वर्गाविषयीं लिहूं, खेड्यांतलीं चित्रें रेखाटूं पण—पण—तीं चित्रें पाहून जातिद्वेषाच्या आरोपावर सरकार तीं पुस्तकें जप्त करील आणि—' हे उद्गार राणा भीमदेवापेक्षां शेखमहंमदाच्या थाटाचेच वाटतात. जेन ऑस्टेनचा कटाक्ष प्रत्यक्ष अनुभवाशिवाय एक अक्षर सुद्धां लिहायचें नाहीं असा होता असें म्हणतात. तो योग्य असो वा नसो, त्याची ढाल आजच्या पांढरपेशा लेखकांना वेळीं अवेळीं उपयोगीं पडण्यासारखी आहे. पण सरकारच्या ब्रम्हास्त्राचा उगीच बाऊ करण्यांत काय मतलब आहे ? कला म्हणजे सौंदर्य, हें सौंदर्य श्रीमंती व विलास यांचें एकुलतें एक अपत्य, आणि प्रणयवृत्ति ही या अपत्याची दाई, या त्रिकोणांत वावरणाऱ्या कल्पनेचा ज्यांच्या मनावर पूर्णपणें पगडा बसला आहे, त्यांना बहुजनसमाजाशीं समरस होणें अगर खेड्यांतल्या जनांचें, मनाचें आणि वनाचें विविध सौंदर्य आपल्या वाङ्मयांतून कुशलतेनें प्रगट करणें फारसें शक्य नाहीं.' फार वर्षे पिंजऱ्यांत राहिलेल्या पोपटाला स्वच्छंद वनविहार कसा आवडावा ? त्याला बंधनमुक्त केला तरी तो पिंजऱ्याभोंवतीच घिरट्या घालीत राहणार !

अभिजात, उच्च वगैरे कितीही विशेषणें लावलीं तरी व्यापक दृष्टीनें पाहिलें कीं गेल्या अर्ध शतकांत निर्माण झालेलें मराठी ललित वाङ्मय एखाद्या तळ्याप्रमाणें वाटतें. संस्कृत व इंग्रजी वाङ्मयांतून वाहणाऱ्या अखंड धारांनीं तें भरल्याचा भास प्रथम प्रथम झाला. त्यांत कल्पना विलासाचीं कमळें फुललीं. तळ्याच्या आसपासच्या शेतीला त्याच्या पाण्याचा फायदा व्हावा, त्याप्रमाणें

सामान्य लेखकांना या वाङ्मयानें स्फूर्तिही दिली. गांवांतला गुलहौशी श्रीमंत तळ्यांतच आपली नौकाविहाराची हौस भागवून घेतो, त्याप्रमाणें करमणुकी-करितां वाचन करणाऱ्या मूठभर अर्धशिक्षित सुखवस्तु लोकांना या वाङ्मयानें घटकाभर आनंदही दिला. पण खरोवरांत आढळणारा पाण्याचा जिवंत झरा या तळ्यांत बरेच दिवस दिसत नव्हता हे मात्र खरें. अलीकडे त्याची — बोटभर कां होईना — धार उत्पन्न झाली आहे. वरेरकर, कुमार रघुवीर आनंद, वि. स. सुखठणकर प्रभृतींचें लिखाण ह्मणजे या बदलणाऱ्या मनूचीं पूर्व चिन्हेंच आहेत.

शहरांतील दलित वर्गाचीं चित्रें रेखाटणाऱ्या लेखकांना आज ना उद्यां खेड्याकडे वळावेंसें वाटेलच. ही प्रवृत्ति ह्मणजे कांहीं वाङ्मयांतली फॅशन अगर चवचाल लहर नव्हे. महात्मा गांधी 'खेड्यांकडे चला' म्हणून उपदेश करीत आहेत, इलाखाधिपति ग्रामोद्धारासाठीं दौरे काढीत आहेत, तेव्हां आपणही खेड्याच्या नांवानें गोंधळ घालूं या, अशा कल्पनेनें या नव्या मनूचें स्वागत करणाऱ्या लेखकांची कींवच करावी लागेल. मराठी सारस्वताची गंगा पांडित्याच्या आकाशांतून कल्पनेच्या मृत्युलोकावर उतरल्याला बरेच दिवस झाले. पण ती तिथेंच घुटमळत राहणार नाहीं पाताळांतील सागर पुत्रांच्या रक्षेपर्यंत जाऊन त्यांचा उद्धार केल्याखेरीज तिला चैन कसें पडेल ? शाळेंत असतांना निबंधांत अगर वादविवाद सभेंत खेड्यांतील जीवनाची स्तुति करण्याचें काम कोणीही करील. पण समुद्राप्रमाणें अफाट पसरलेल्या आपल्या खेडवळ जीवनाचें मंथन करून त्यांतलीं रत्नें काढायला मात्र प्रतिभासंपन्न लेखकच हवेत.

शहरांतील आयुष्यक्रमाला चटावलेला लेखक ह्मणेल 'खेड्यांत आहे काय असं पाहण्यासारखं ? मोडकीं तोडकीं घरं, घाणेरडे रस्ते आणि दरिद्र लोक !' या मनुष्याचें पाहणें ह्मणजे मुलगी पाहण्याचाच निराळा प्रकार. सौंदर्यजन्य आनंदाला आसावलेल्या अंतःकरणाला खेड्यासारखें दुसरें योग्य ठिकाण नाहीं. इथें पहाटे ट्रॅम गाड्यांनीं झोंप मोड व्हायची नाहीं; उलट कुठल्यातरी देवळांतल्या

चौघडयाचे मंद शांत ध्वनि झोंपमोड न होईल अशा बेतानेंच वातावरणांतून पाऊलें टाकतील. ब्राह्ममुहूर्तावर एखाद्याला उठायचेंच असेल तर खेड्यांत गजराचें घड्याळ कशाला हवें? कोंबडा त्याला वेळेवर साद घालायला कधींच चुकायचा नाहीं. डोळे उघडून खिडकीबाहेर पाहिलें तर त्याची दृष्टि दगडाच्या बेडौल व अजस्र इमारतींवर कधींच पडणार नाहीं. प्रभातवायूच्या तालावर नर्तकीप्रमाणें नृत्य करणाऱ्या केळी आणि तें नृत्य पाहून रसिकतेनें मान डोलावणारे माड त्याच्या स्वागताकरितां सज्ज झालेले दिसतील. त्यावेळीं पडणारें दंव पाहून जणुं कांहीं आकाश गुलाबपाणी शिंपडीत आहे असाच त्याला भास होईल. पाहुणा कवि असेल आणि त्याला अरुणावर कविता करायची इच्छाच असेल तर त्यानें यावेळीं जवळपासच्या एखाद्या टेंकडीवर अवश्य जावें. 'हा अरुण कसला? कसाईखानाच आहे हा! पहा जिकडे तिकडे अंधाररूपी बकऱ्याचें रक्त वाहत आहे' असल्या अभद्र किंवा 'हा अरुण नव्हे, शयनमंदिरांतून घाईघाईनें बाहेर पडतांना निशेचा पाय लागून सांडलेली ही सुरईतील मदिरा आहे' असल्या चमत्कृतिप्रधान उत्प्रेक्षा त्याला मुळींच सुचणार नाहींत. त्याला जें सुचेल तें यापेक्षां अधिक सुंदर व रसपूर्ण असेल. तें इथें लिहिणें म्हणजे प्रस्तावनाकारानें गनिमी काव्याचा आश्रय करून आपली कविता वाचकांच्या गळयांत बांधण्यासारखें होईल.

वाङ्मयांतल्या पांढरपेशा म्हणा, नागर म्हणा अगर विलासी म्हणा पण सर्वस्वी संकुचित अशा या दृष्टींत, काव्यापुरतें का होईना, 'सुगी' मुळें अंजन पडेल. बोरकरांच्या कवितेंतलें सुखक्षणांचें वर्णन (पृ. १९–२०), पाठकांच्या कवितेंतील खेड्याचें (पृ. २०–२१) आणि सोपानदेवांचें मळयांत जातांनाचें (पृ. ३१–३६) वर्णन वाचतांना फेसानें भरलेलें गाईचें निरसें दूध आपण पीत आहों असें वाटतें. आगगाड्या, मोटारी आणि बंगले यांच्या वर्णनांचा कडक चहा नित्य पिणाऱ्यांना देखील तें निःसंशय आवडेल. 'कापसाचें शेत' (पृ. २८) या किशोरांच्या कवितेंतील कल्पनाविलासही मोठा रमणीय आहे, मात्र हें शेत पिकविणारा शेतकरी जरा सुशिक्षित दिसतो.

झाडांच्या राया, कापसाचीं शेतें आणि ऊसांचे मळे अशलीं मंदिरें काव्यदेवतेला कां आवडणार नाहींत ? पुरुषभर उंच वाढलेल्या ऊंसाच्या मळ्यांत प्रौढ जोडप्याला नेऊन सोडलें तर त्यांनादेखील लपंडावानें अगर पाठशिवणीनें खेळण्याची हिरिरी आल्यावांचून राहणार नाहीं.

कविहृदय निसर्गाकडून मनुष्याकडे वळले कीं खेडेगांवांतलें अकृत्रिम जीवन त्याला मोह घालतें. शेवंती ( पृ. ३८ ), मंजुळा ( पृ. ३९-४० ), रायबा ( पृ. ५३ ), या कविता या दृष्टीनें गोड वाटतात. जणुं कांहीं हिर वळीवर फुललेलीं साधीं फुलेंच. ' ही कोण ? ' ' इरलेवाली ' आणि ' सुंदरी ' ( पृ. ४०-४२ ) या कवितांतलीं मुग्धतरुणींचीं चित्रें पार्श्वभूमीच्या नाविन्या-मुळें ठराविक ठशाच्या प्रणयचित्रांपेक्षां अधिक आकर्षक वाटतात.

पण खेड्यांतलें हें साधें भोळें जीवन सुखी कुठें राहतें ? अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या जाळ्यांत त्याचें हां हां ह्मणतां पीठ होतें. ' पाटीवाली ' ( पृ. ४७ ), ' मोळीवाला ' ( पृ. ८० ), ' कोंकणचा शेतकरी ' ( पृ. ८७ ), ' कोंकणचा कुळवाडी ' ( पृ. ८९ ), इत्यादि कवितांत हें स्पष्टपणें प्रतिबिंबित झालें आहे. ' पावसाचें गीत ' या कवितेंत ज्येष्ठापासून आश्विनपर्यंतच्या शेतांतल्या कामाचें सुंदर चित्र रेखटून आनंद कवींनीं शेवटीं

' आला आला मंगशीर — भात झालें खळ्याभर
करतां सरकारी भर
शेतऱ्याच्या नयनींनीर !! '

असे उद्गार काढले आहेत. ' कलेसाठीं कला ' असा आक्रोश करणारे रसिक या कवितेंतील हें शेवटचें कडवें कापून टाकायला तयार होतील. काय नेम ? त्यांत समाजसत्तावादाचा किंवा कायदेभंगाचा वास यायचा ! कलावंतांचीं घ्राणेंद्रियें फार तीक्ष्ण असतात ह्मणे ! तत्वाच्या अगर उपदेशाच्या लवंगेनेंसुद्धां त्यांना उष्णता होते. पण या गाण्याचें शेवटलें कडवें कापून टाकणें ह्मणजे विंचवाची नांगी मोडण्यासारखेंच आहे असें मी तरी ह्मणेन. ललितलेखकानें मतप्रचारक ( Propagandist ) होण्यांत धोका आहे; पण विशिष्ट मतप्रचार

( Propaganda ) आणि जीवनांतील कूटप्रश्न ( Problem ) यांच्यांत कलावादी लेखक समजतात त्याच्यापेक्षां फार अंतर आहे. सरस्वतीचें आसन व्यासपीठ नसून मयूरासन आहे हें प्रो. फडके यांचे ह्मणणें कुणीही मान्य करील. पण मयूरासन ह्मणजे कमलासन मात्र नव्हे अशी पुस्ती त्याला जोडलीच पाहिजे. शिवाय सरस्वती मयूरासनावर बसलो असली तरी आपण सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची कन्या व बुद्धिदात्या गजाननाची अर्धांगी आहों याची आठवण तिनें ठेवायला नको काय ?

' सुगी ' च्या दुसऱ्या भागाच्या आरंभीं खेडवळ शेतकऱ्यांचा साधा-भोळा पण सुखी आयुष्यक्रम दाखविणाऱ्या ' समाधान, ' ' अम्ही तर जंगलचीं पांखरें, ' इत्यादि कविता असून पुढें ' आगोट ' पासून ' गोफणवाला ' या कवितांपर्यंत शेतांतल्या निरनिराळ्या कामांचें समरसतेनें शब्दचित्र रेखाटणारीं गीतें आहेत. ' गरिबीचा पाहुणचार ' या पृ. ८२ वरील कवितेपासून विविध नाट्यगीतांचा ताटवा लागतो. भावना व कल्पना यांच्या सुंदर मिलाफामुळें यांपैकीं बरींच गीतें सरस वठलीं आहेत. उत्कृष्ट काव्य हें संगीतमय चित्रपटासारखें असतें. संगीताच्या तालावर चालणारें शब्दचित्रांचें मोहक नृत्य ' लुटारूंनीं ह्मटलेलें गाणें ' ' कोळ्याचें गाणें ' ' शीळ ' इत्यादि गीतांत आढळतें.

देवाप्रमाणें काव्यही बाह्य उपचारांवर अवलंबून नसतें, भाव हाच दोघांचा आत्मा या सत्याची प्रचीति हीं ग्रामगीतें वाचतांना वारंवार येते. कुठें कालीदासाची अलकेंतल्या रत्नमंदिरांत राहणारी विरहिणी यक्षपत्नी आणि कुठें ठोकळांची पहांटे जाग्यावर दळत बसलेली दुष्काळपीडित दरिद्र्याची कारभारीण ! परंतु हॅम्लेटच्या शब्दांत—पण अगदीं भिन्न अर्थानें—कोणी ही ह्मणेल, हें चित्र पहा आणि हें चित्र पहा.

" पहाशील तूं तिला कदाचित् देवांतें पुजितांना,
किंवा ध्याउनि माझी मूर्ती चित्रपटीं लिहितांना,

असेल अथवा पिंजऱ्यापाशीं उभी पुसत मैनेला,
" कां गे, आठवतो तुजला ता प्राणसखा रंगेला–"
घेउनि हातीं सारंगी वा कालक्रमण कराया
स्वयें रचियलों मजविषयींची लागे गीतें गाया,
तैं डोळ्यांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजुनी तार
स्वयें घेतला मधेंच विसरे अलाफ वारंवार. "

( मेघदूत )

" दूरदेशीं गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोन
राया डोळ्यामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
तुझ्या डोईवर अक्षी पागूट कुसुंबी
तुझं वठ बाई जशी फुलली डाळिंबी
तुझ्याबिगर रे मला घासही जाईना
तुझ्याबिगर रे मला पाणीही घेटना. "

( जात्यावरलं गाणं, पृ. १०३ )

दोन्ही चित्रें सारखींच हृदयंगम वाटत नाहींत का ?

चंद्रशेखरांचें सुगीच्या आरंभीं दिलेलें ' उगडं गुपित ' हें खंडकाव्य म्हणजे तर ग्रामगीतांच्या बाजूनें केलेली उत्कृष्ट वकिलीच आहे.

" फिरे कलमवज्र हें वचनमौक्तिकांच्या वरी
ममायुगुण गोंवुनी बनवितो तयांच्या सरी. "

अशा बाण्याच्या राजकवीच्या या खंडकाव्यांतील नायक आपल्या प्रियकरिणीला उद्देशून,

" जल्मांतरचं काइबी आपलं ध्येनं येनं असल
त्येच्यावांचुन तुजवर सहसा हे मन कां गं बसल. "

असे उद्गार काढतो त्यावेळीं ' शकुंतला क्षत्रिय कन्याच असली पाहिजे. नाहीं तर माझें मन तिच्यावर कसें बसलें असतें ? ' या दुष्यंताच्या प्रेमळ तर्क-शास्त्राची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. मदनाच्या मोहिनीमंत्रापुढें संताजी काय अगर दुष्यंत काय दोन्ही सारखेच ! संताजीनें थारोळ्यावर पाहिलेल्या कबूतरांच्या जुळ्याचें वर्णन आणि

' संताजीचे पडतच न्हाइत बोल तिते खालती,
पाडा अल्ये जनु आंबे त्ये झेल्याने झेलती."
' तुम्ही मिठाचा नवत वैन्स खडिसाकरचा खडा ! '
' सदाच व्हावा नवा जिवाळा, सभाव ह्यो प्रीतिचा '
' अन् गालांची गोड न्यहारी निनें दिली घेतली '

इत्यादि ओळींत रातांब्याच्या पन्ह्याप्रमाणें अवीट माधुरी आहे.

श्री. श्री. बा. रानडे यांची लेजीम ही कविता नाविन्यपूर्ण आहे. तिच्या शेवटीं ते पहांटेचें वर्णन करतात—

' पहाट झाली, तारा थकल्या
डफवाला तो चंद्र उतरला
परी न थकला लेजिममेळा '

चंद्राला कवीकडून आजपर्यंत अनेक पदव्यांचे अहेर झाले असतील. पण मदनाच्या या जिवलग मित्राला ' डफवाला ' करण्यांत रानड्यांनीं दाखविलेली कल्पकता खरोखरीच मौजेची आहे. शब्दरचना अर्थसूचक व पारिपोषक करण्यांत कवि आनंद किती कुशल आहेत हें ' गुराखीण ' या कवितेवरून कळून येईल. ' Sands of the Dee ' ही इंग्रजी कविता या कवितेशीं तुळून पाहिली तरी आनंदाचे काव्यगुण डोळ्यांत भरल्यावांचून राहणार नाहींत. विंचवाप्रमाणें पाठीवर बिऱ्हाड असणाऱ्या ' गोपाळ ' नांवाच्या जंगम जातीच्या जीवनाचें त्यांचें वर्णनही साधेंच पण सुंदर आहे. ( पृ. ४९ )

' कोंकणचा शेतकरी ' या करुण गीतांत भात कसें आलेलें पाहून खोत रागावतो व लगेच भाताची रास हातोहात उंच होऊन,

'कोंकणचा शेती ! नुस्ता नांवांत
पिकतें तें सारें खोताचें भात.'

असे उद्गार काढतो. ही त्यांची कल्पना निःसंशय चमत्कृतिजनक आहे.

श्री. ना. घ. देशपांडे यांची शीळ गेल्या वर्षापासून लोकांच्या कानांत घुमत आहेच. या संग्रहांतील त्यांच्या इतर पांचही कवितांत मार्दव माधुर्य आणि मोहकता यांचें सुंदर मिश्रण आढळतें. 'सुगी' 'मोटकरी' 'भिंगरी' या त्यांच्या कविता गोड आहेतच. पण 'शीळ' या गीतांत मनाला भारून टाकणारें काव्यसंगीत आहे यांत संशय नाहीं. केशवसुतांनीं मराठी कवितेला पंडिती भाषेच्या कचाट्यांतून मुक्त केली. पण काव्यांत व्यवहारांतली भाषा योजण्याच्या भरांत त्यांनीं ती गद्यप्राय केली. काव्याचें संगीताशीं अगदीं निकटचें नातें आहे हें केशवसुतांच्या फारसें लक्षांतच आलें नाहीं. दत्त, बालकवि व तांबे यांनीं तें पूर्णपणें जाणलें. श्री. देशपांडे यांच्या सर्व कवितांवरून त्यांच्या अंगीं हा गुण बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वास करीत आहे हें स्पष्टपणें दिसतें. गिरीशांच्या भलरींतील

"शिवारिं जित्राप नागावानी
सळसळ् आवाज, डुलती फनी
डुइवर धरलँ मोत्याचँ मनी
कवळुन आनुया वर्साचा सौदा
भलरि दादा ! भलँ गडि दादा !"

हें कडवें आणि यशवंतांच्या दोन्ही कविता वाचून या प्रमुख कवींनीं असलीं गीतें विपुल लिहावीं असें कुणाला वाटणार नाहीं? साधुदासांचें 'उद्या येदाळा' हें गाईची समजावणी करून तिला पाणी प्यायला सांगणाऱ्या घरधानिणी विषयींचे गीत आकर्षक आहे 'पाहयलँ ग दारीं' 'लक्ष्मी' 'विनवणी' इत्यादि कविताही गोड आहेत. फिकट दिसणाऱ्या चंद्राला 'तुझा प्रेमभंग झाला आहे वाटतं?' असा प्रश्न शेलेनें केला असेल. पण देशपांड्याच्या 'रामपहारीं' या कवितेची नायिका त्याला ह्मणते,

" अन् कशास येसी चंद्रा माझ्या मागं
भयभीत अशी मी कोणिच नाहीं जागं "

या संग्रहांतील ' पेरनीचा होका ' ही कविता पूर्वखानदेशस्थ लेवापाटीदार शेतकऱ्यांच्या भाषेत आणि ' नागणी ' ही ऐराणी ( म्हणजे इराणांतील नव्हे. खानदेश, नाशिक व मोंगलाई यांच्या कांहीं भागांत प्रचलित असलेली ) भाषेत लिहिलेली आहे. विशिष्ट बोलीन नमुने या दृष्टीनें या कविता ठीक आहेत. पण गोमांतकापासून ग्वालेरपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्रांत इतक्या बोली प्रचारांत आहेत कीं प्रत्येक कवीनें आपआपल्या बोलींत कविता लिहायचा निश्चय केला तर गगनचुंबी बुरुज बांधणाऱ्या बाबिलोनच्या लोकांइतकीच वाचकांची दुर्दशा होईल. ईश्वराच्या शापानें त्यांच्या भाषा एकदम भिन्न झाल्या व एक काय म्हणतो तें दुसऱ्याला कळेना ! बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात. पण कोंकणांत तर पावलांवर ती बदललेली आढळून येते. एकाच प्रदेशांतील ब्राह्मण–सारस्वत ब्राह्मण–भंडारी–गाबित–किरिस्तांव यांच्या बोलण्याच्या भाषा भिन्न आहेत एवढेंच नव्हे तर यापैकीं प्रत्येक जातीच्या जशा पोटजाती आहेत त्याप्रमाणें प्रत्येक पोटजातीगणिक पोटबोलीही आहे. खरेंच आहे ! जगांत पोट मागें लागलें नाहीं असा कोण आहे ? मग जाती व बोलीच या नियमाला कुठून अपवाद ठरणार !

विपुल टीपा दिल्या तर अशा कविता लिहायला काय हरकत आहे असा प्रश्न या बाबतींत साहजिकच उपस्थित होईल. पण टीपांच्या साहाय्यानें काव्यरसाचा आस्वाद घेणें म्हणजे कुबड्या लावून नृत्य करण्यासारखें आहे. बखरी भाषा आणि फारशी भाषा यांच्याप्रमाणें खेडवळ भाषेचा अगर बोलीचाही अतिरेक कवितेंत अक्षम्यच मानला जाईल. वर्णनपर, विचारात्मक अगर कवीची भावना रंगविणाऱ्या कवितांच्या बाबतींत बोलीचा प्रश्न उपस्थितच होत नाहीं ! नाट्यगीतें मात्र निव्वळ शुद्ध भाषेंत लिहिल्यास रसहानि होईल. पण त्यांची भाषा कुणबाऊ असली तरी सर्वत्र प्रचलित असलेली अगर सहज कळेल अशी असणें आवश्यक आहे. या संग्रहांतील चंद्रशेखर,

यशवंत, देशपांडे इत्यादिकांची भाषा त्या दृष्टीनें ठीक आहे. ठोकळ, सुरेश वगैरे खेड्यांत वाढलेले, जातीनें मराठ असल्यामुळें खेड्यांतील बोलीशीं त्यांचा परिचयही अधिक ! यामुळें त्यांच्या कवितांत बोलीचा प्रभाव अधिक उठून दिसतो. पण त्यामुळें दुर्बोधता आली आहे असें मात्र वाटत नाहीं. कला ही कृत्रिमच असायची. पण कलावंताचें कौशल्य ती नैसर्गिक आहे असें भासविण्यांतच नाहीं का ?

दुसरा एक इषारा जातां जातां देणें आवश्यक वाटतें. नवीन टूम निघाली कीं तिचें अनुकरण हें व्हायचेंच. अनुकरण म्हणजे आत्महत्या आहे असें कुणीसें ( तो कुणी मी मात्र नाहीं ) म्हटलें आहे. पण वाईट अनुकरणांत नुसती आत्म-हत्याच नसून दुसऱ्याचा खूनही होतो. ज्या चालीनें, उद्धव गोकुळांतल्या दुःखी लोकांचें सांतवन करण्याकरितां गेला त्या चालीवर आपल्या शूर पूर्वजांच्या घोड्यांना—व प्रसंगीं त्यांनाही—दौडायला लावून महाराष्ट्रांत राष्ट्रीय कवितांचे कारखाने निघाले. प्रेमभंगाचीही तीच स्थिति ! आईच्या पोटांत मरणाऱ्या बालकांप्रमाणें जन्माला येण्यापूर्वीच कित्येक कवींच्या प्रेमाचा भंग झाला व ते अज्ञात ( कदाचित् अजातही ) सुंदरीच्या नांवानें रडूं लागले. हातसुताच्या हातानें विणलेल्या खादीला महात्माजी जेवढें महत्व देतात तेवढाच स्वतःच्या भावनासूत्रांतून आपल्या कल्पनेनें तयार केलेल्या काव्याला किंमत दिली पाहिजे. फोटोंचे फोटो व पुन्हां त्या छायाचित्रांची छायाचित्रें घेण्याची पद्धत सुरू झाली कीं तीं निर्जीवच व्हायचीं.

‘ मोलें घातलें रडाया ’ अशा थाटाची कविता खेडवळ जीवनावर लिहि-ण्याचा मोह होतकरू कवींना होण्याचा फार संभव आहे. ‘ रात्रभर थंडींत कुडकुडत गाडी हांकणारा गाडीवान पाहिला कीं धर त्याला आणि लिही त्याच्या-वर कविता ! बांधावर कसलें तरी फूल दिसलें कीं मारा हांक स्फूर्तीला ! शेतकरी दिसला कीं गेलाच हात फाउंटनपेनकडे ! ’ असें झाल्यास रसिकांना जानपद कवितेचा ‘ जानुपदा ’शीं जवळचा संबंध आहे—गुडघे टेंकून कवीचे पाय धरण्याइतका तरी—असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. जिवंत भावना

( Emotion ) व तिची निर्जीव छाया ( Sentimentalism ) यांच्यांतील अंतर न कळल्यामुळें आधुनिक मराठी काव्याचा बराच भाग नीरस व कृत्रिम झाला आहे. त्यांत, खेडीं न पाहतां, त्यांतल्या आयुष्याशीं समरस न होतां, स्त्रीदाक्षिण्याप्रमाणें दीनदाक्षिण्य दाखविण्याच्या हेतूनें लिहिलेल्या कृत्रिम कवितांची भर पडायला नको.

कल्पना व भावना हीं काव्यलतेचीं मुळें! निसर्ग, व्यक्ति व समाज यांच्यांतलें सौंदर्यजल भावना शोषून घेते. या शोषून घेतलेल्या सौंदर्य जलाला कल्पना किरणांचें सहाय्य मिळालें कीं काव्यलतेवर हिरवींगार पानें आणि सुंदर फुलें चमकूं लागतात. सुगींत अशा फुलांचें मोहक संमेलन झालें आहे. इथें चंद्रशेखरांसारख्या साठी उलटलेल्या राजकवींच्या मांडीला मांडी लावून देशपांडे, ठोकळ, बोरकर वगैरे पंचविशिच्या आंतील कवि बसलेले आढळून येतील; यशवंत, आनंद, मायदेव, गिरीश, काणेकर, वगैरे लोकप्रिय कवींची साथ पंडित, सोपानदेव, फाटक, ग. ह. पाटील, सुरेश प्रभृति उदित अगर उदयोन्मुख कवींनीं उत्तम रीतीनें केलेली दिसेल. चंद्रशेखरांचा नाशिककडला संताजी पुरणपोळ्यांचें जेवण देईल तर गोमांतकांतील बोरकरांचा नायक पहांटे डोंगरमाथ्यावर गोळा केलेले स्वादिष्ट काजू वाचकांच्या पदरांत टाकील. अशा या रम्य संमेलनाचें निमंत्रण कोण नाकारील? आणि म्हणूनच संमेलनाच्या द्वारावर स्वागताकरतां नेमलेल्या माझ्यासारख्या मनुष्यानें निमंत्रितांचा अधिक वेळ घेणें शोभणार नाहीं. ठोकळांच्या मनांत येणार नाहीं; पण 'भटाला दिली ओसरी' अशी थोडीशी. या प्रस्तावनेची स्थिति झाली असण्याचा संभव आहे. हातपाय पसरतांना ते कोणाला लागले असल्यास नमस्कारपूर्वक त्यांची क्षमा मागण्यापलीकडे मी तरी दुसरें काय करूं शकणार?

शिरोडें
२-१२-३३

वि. स. खांडेकर



संताजी शेलार व रंगू ( उघडें गुपित )

—राजकवि चंद्रशेखर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६३
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य १०८
२८-१२-३३
ठाणे

# उघडें गुपित्

[ गोषवारा:—पूर्व संकेतानें मोहतूर लावण्यास उत्सुक असलेली रंगू नांवाची कोणी गतभर्तृका, आशेगांवीं एका मित्राच्या घरीं एकांतांत बसली आहे. तिला पाहणाच्या हेतूनें कोणी संताजी शेलार ह्मणून भांगरवाडीचा पाटील, हा तेथें येतो; व तिला भेटून आपलें मनोगत व परिस्थिती सांगूं लागतो. हा ह्या काव्याचा आरंभ, आणि रंगू धनीण होऊन संताजीच्या घरीं आनंदानें नांदूं लागते, हा शेवट. ]

चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे

# सुगी

## ( १ )

मनात माज्या हाये काय त्ये  जिकून घ्येशिल तर
तू म्हन्शिल् त्ये करून रंगू ! व्हइन तुजा चाकर.
काय् सांगू गे गमावली जी,  कुटं दिसं ना पुना,
ती नजरंला अवचित आली,  पटल्या खानाखुना.
काय् दैवाची अगटित करनी, ह्येच रूप त्ये जसं;
त्यानं झाकुन्  उगडं केलं, फिरुन् जसंच्या तसं,
तुला देखता अंत्रामीचा  पाजर फुटला झरा;
त्यात जीव ह्यो जनु  बत्तासा, इरून गेला खरा !
डोळ्या संगं तुज्या मिळवूला  डोळा म्या ह्यो जसा,
चित्रावानी तसा जडवूला इतं मला तू कसा !
या नजरंतुन् जंतर मंतर का भरलीं मोहनी ?
ती पडताक्श्येनि काइ बि सुचंना, येडा जालो मनी.
जल्मांतरचं काइ बी अप्लं घ्येनं देनं असल्;
त्येच्या वाचुन् तुजवर सहसा ह्ये मन का गं बसल्.
गुंजाळाची सकू नव्हं का; हाये वळकिची तुज्या ?
तिनं आज ह्यो घाट घातला ! तिनंच केली मजा !
ती निंदाया मळ्यात आली, लइ गं श्यानी, गुनी !
सबाब तरि पन् काय ग्वोड तो ! अन् कन्वाळू मनी
मी पाटावर बसून व्हातो, उदास ह्ये मन् कसं !–
त्या पाटाच्या पान्यामंदी ढेकुळ पडलं जसं.

हात पाय बी ढिलं ! खताचं ढीगच जनु घातलं.
त्येंच्या वानिच् सुकून गेलं पानी माज्यातलं.
अंगामंदी काइबी माज्या रामच नव्ता तवा.
थपडी सरशी उल्थुन् देती मला कुनी बी अवा !
काल सुकाचं सपन् पाह्यलं ज्ये थारोळ्यावर,
त्येनच् कासाइस केलं ग कत्रळं ह्ये अंतर !
केविलवाना बगुन् सकू ती आली माज्याकडं,
तिला देखता खळबळ जाली. अन् कोसळलं रडं.

( २ )

सकू म्हंगाली, "कावो पाटिल् ! श्यानं असुन्शानि असं,
पोरावानी रडंत बसला ! येला ह्मनावं कसं ?
मी वादुळ्ची दूरुन् बगत्ये, वळक् पटंना मला,
वाटं पोळुन् वैतागुन् ह्यो बसलाय् कुनि येकला,
नव, ह्ये श्येलार् ! संतू पाटिल् ! न्यहाळता उमगलं,
इक्त्यामंदि म्या ह्ये दुक्काचं कळवळनं आइकलं.
मग राहवंना, धावत आल्ये, बगल्ये तो त्ये खरं !
आता तुमच्या या दुक्कावर घालिन मी फुंकर.
जालं गेलं त्येची चिन्ता, उपेग काय् वो तिचा !
सदाच व्हावा नवा जिवाळा, सबाव ह्यो प्रीतिचा
ग्येल्या मांगं कुनि ग्येलय् का या दुन्येमादि कदी ?
सुकासुकी का जीव जाळता ? रडं पुसा ह्ये अदी.

मुळुमुळु रडनं ह्ये आवाला, नवं तुमाला बरं,
उठा रावजी असं ढिलं का ? बांदा की कंबरं.
हितगुज तुमचं सकू जानत्ये, ही मन्कवडी लना,
येका घद्कत् होतुर लावुन् ही घर मांडिल पुना !
तुमच्या साठीं चद्क् चांदनी रंगू म्या पाह्यली
आश्येगावी ती माहेरीं वाट बगुन् राह्यली !
उद्याच जात्ये, आपुन् बी या माज्या संगं तितं
नग सांगाया तुमास पुढलं समदं त्ये माहितं."

( ३ )

"ह्यो आश्येला अंकुर फुटला ! अम्रुत त्ये पाजिवं,
तुज्या दयेन कुडीत माज्या नवाच आला जीवं;
इकुतं माजं जुळवुन् घे तू सकू मला रोकडं,
पोश्याकाचं चोळी लुगडं लागुलं माज्याकडं;
देवा ! देई येश इला तू होतुर ह्यो सुब घडो !
सकुच्या, माज्या, अन् रंगूच्या मुकात साकर पडो !
निरोप घेवुन् ग्येली मग ती कामाला लागली.
उजवा डोळा लवला ! गाठच मुंडाश्याला दिली !"

( ४ )

"थारोळ्यावर खबूतराचं पायूलं व्हतं जुळं,
म्या प्रीतीच्या त्येंच्या गमनी बगीतल्या वाटुळं.

गळ्यामंदी त्ये गळा घालिती, चोचीनं टोचिती,
"गुटुर्गुङ्-गुटुर्गुङ्." असा ह्येतुचा सादच जनु घालिती.
लटकत माना, घालित वळसे, मारिति मुरके कसे !
पुडं पुडं ती ढकलुन् तोंडं मुकेच घ्येती जसे !
अन् तोंडावर तोंड ठिवुन् त्ये न्यहाळिती फिरफिरुन्,
येक जीव त्ये असं बगुन् ह्यो ऊरच आला भरुन्,
मनात ह्मटलं व्हतं माजं असंच ना पाकरू ?
घास तोंडचा ग्येला ! देवा, अता कसं मी करू ?
काय् सांगू ग प्रीत ग्वोड ती, निव्वळ साकर जशी !
पन् कर्मानं व्हावुन् ग्येली राळच तीची कशी !
घडी बसल् का पुना सुकाचा त्योच पिकल् का मळा ?
असं पाकरू मला मिळल् का हीच कराया लिळा ?
का ग रंगू लाजलीस तू ? जुळवू अपलं जुळं !
श्येलाराचं हाये दुधानं चोखट धुतलं कुळं,
भांगरवाडी पाटिलकीची हायेच अमच्या कुळी.
पिडीजातचं जुनं वतन् जनु ती हरळीची मुळी !
संताजीचं पडतच न्हाइत बोल तितं खालती,
पाडा आलये जनु आंब्रे त्ये झल्यानं झेलती.
सोनं पिकतय् कच्च सोनं बागाइत त्ये असं !
"कोरडवाहू" नावाला पन् सत्व गवाचं जसं !
घर बी हाये पुना बांदलं त्ये बंगल्या सारकं,
लक्ष्मी वाचुन् सुनाट पन् त्ये रंगूवाचुन् फिकं !—"

( ५ )

इतुकें वदतां व्याकुळ होउनि पडले बसनावरी,
ते संताजी पाहुनि त्यांनां रंगू हो घाबरी.
त्या एकांतीं धांवुनि आली, कळवळली ती मनीं;
शेलारांना हुशार केलें तिनेंच जल शिंपुनी.
मग पदरानें तन्मुख पुसुनी विंझणवारा करी,
सन्निध बसुनी प्रेमें त्यांनां कुरवाळी गोजरी.
कंवटाळुनियां तिनें तयांनां अधरामृत पाजिलें;
हितगुजरूपी प्रेमरसायन कानीं हें ओतिलें:–

( ६ )

" असं काय् बरं ! धीर धरावा, प्रीतीचं ह्मोतुरं
व्होवुनू ग्येलं. संगं येत्ये. मांडिन् अपलं घरं.
कुळवंताचं थोंर घरानं आज कुटं गावतं ?
दैव उगडलं माजं ह्मनुनच अपुन् आला धावतं !
अपल्या ह्मन्न्या भाइर नाइत मी, माजी मानसं;
लौकिकातलं ह्मोतुर चट्कन् अट्पुन् घेऊ कसं.
समदं काई तयार हाये जानोश्याच्या घरीं,
सकुला धाडुन् घेस्ये आता; जात्ये मी माह्यरीं.
ज्ये ज्ये करनं त्ये त्ये सारं तिच्या इच्यारं करा,
धीर धरा. इस्वास ठिवा, मी येईन् अपल्या घरा. "

( ७ )

' झोतुर ' झालें, शेलारांनां रंगू मिळवुनि दिली;
नवयुग्माची पदरगांठही सखू हिनें बांधिली.
पोषाकाचें चोळी लुगडें हंसत तिनें घेतलें,
आशेगांवीं करुनि खुशाली वऱ्हाड तें परतलें.
गाडीवानें दिले कासरे सोडुनियां सैल ते;
भांगरवाडीकडेच पळती चपळ असे बैल ते.
गाडींतुनि ती रंगू झळके शेलारां सन्मुख;
सखूहि उजवीकडे बसुनियां पहातसे कौतुक.
संताजीच्या मुखकमलीं ती भ्रमरी जडली जशी;
प्राशित होती प्रेमरसातें तन्मय होउनि कशी !
आशेगांवीं शेलारांनां पाजुनि संजीवनी,
पुनरुज्जीवन जिनें दिलें, ती शुक्राची चांदणी !
या समयाला क्षितिजावरती उच्चीला येउनी,
सौभाग्यानें मिरवे; जणु ती वनदेवी योगिनी.

( ८ )

फराळ झाले, विड्यामागुनी पानविडे चालले,
विनोद, थट्टा, हंशा, खुशाली, एकच रण माजलें !
रंगूला ती सखू ह्मणाली, " अता करुन् घ्ये मजा !
भोगीचा सन् आजच हाये. भोगइडा घे तुजा !

आता बंगल्यामंदी तुमचा चालू द्या गोंधळ,
इयेलार् वाध्या, अन् रंगू तू मुरळी;—त्येंचं कुळ !"
सुंदरतेची मुद्रा * वारुनि, निसुकारा मारुनी,
रंगू ह्मणते, " असं कराया अन्‌लित् का ह्येरुनी ?
पाटराकनी असून माज्या काय् ह्मन्‌त्या वो ?—चला !
येच्या परतं काइच् करनं नसल् नवं का मला ? "
" वोटी भरनं, पोट झाकनं, समदं जालं. अता—
पाट राकनी—खडा मिठाचा—कश्यास ही रडकता ? "
ही वक्रोक्ती ऐकुनि सखुची रंगू ह्मणते पुन्हां—
" चुकुन् बोलल्ये, माफ करावा आपुन् माजा गुना !
ह्यो सोन्याचा दिवस पाह्यला. समदी अपुली कृपा !
मी अपुनास्नी वेन्सं ह्मन्‌त्ये ! अपुन् अमाला जपा !
तुमी मिठाचा नवंत वेन्सं खडिसाकरचा खडा !—
तोंडात घालुन् अह्यवतंतू दिला मला संवगडा !
इन्मुक व्होवुन् ह्यो मायेचा पदर सोडू नका !
येल मांडवावरती न्येला, त्येला तोडू नका ! "
" श्यानी असता येड्यावानी बडबड का लावली ?
संताजीला हाये सुकाची सकूच ही सावली !

---

* मौजे खातर हातवारे, खुणा, करण्यास शिकवून तयार केलेली अगदीं लहान मुलगी, ' नवरा कसा हवा ? ' ह्मणून विचारतां जी मुद्रा दाखविते, ती सुंदरतेची मुद्रा.

लहानपनूची मइत्र माजी, जवळच ही राहत्ये;
धावत येवुन् दुकूलॆ कुपूलॆ ही माजॆ पाहत्ये.
भांगरवाडित् सकू नव्हॆ, ह्यो माजा चिंतामनी!
ह्यो असता तू करू नको ग रंगू चिंता मनी."
गांवकूस तें दिसूं लागलें अशा विनोदान्तरीं,
पाटिल यांनीं दूत फेंकिला कळवायला घरीं.

( ९ )

अंधुक संधिप्रकाश आतां तिमिरांतुनि विरतसे,
आणि बिजेची चंद्रकोर ती प्रसन्न ऐशी दिसे.
जवळच होती ती तेजस्वी शुक्राची चांदणी,
क्रमाक्रमानें उदया येती तारा तारांगणीं.
वातावरण सुनिश्चल होतें, तेणें वृक्षावळी
चित्रपटासम शोभत होती. पान हलेना मुळीं.
मागसलेले कामकरी ते गवत गुरें घेउनी
रखडत रखडत येतच होते घरास गांवांतुनी.
आशेगांवाहून अगाऊ आला जो चाकर,
त्यानें निर्मळ सज्ज कसें तें केलें होतें घर;
दिवे लागतां नवें जोडपें दारांतचि उतरलें,
तंव हौशीनें * त्यांजवरोनी भात दहीं उतरलें;

* शेजाऱ्याची सुवासिनी कन्या.

दारामध्यें शिगोशीग जें माप गव्हांचें दिसें,
सोनपावलें उलथुनि रंगू जोड्यान शिरतसे;
कुलदेवांनां पानसुपाऱ्या नारळही अर्पिले,
नमन करोनी तयांपुढें तें युग्म उभें राहिलें;
तंव हौशीनें गांठ धरोनी " नावं घ्या ! " ती वदे,
" श्येलारनीला रंगू ह्मनूत्यात ! " पाटिल ह्मणती मुदें!
झणकाऱ्यानें हौशी ह्मणते, " यांचं भारिच्, चला !–
ह्ये धसमुसळं नगं, उकाना काकी घ्या चांगला ! "
" आश्येगावी ह्या आश्येनं दुक लई पाह्यलं,
ह्मनून संताजींच्या चरनी ह्ये मन म्या वाह्यलं. "

( १० )

गांठ सोडिली, पाटिल येऊनि बसले वसनावर,
' राम राम ' मग तयांस केले सर्वांनीं सादर;
रुपरुपया ते इनाम देती आनंदें सेवकां,
पत्नीला तन्नामें, परिचय, सांगति गुणकौतुका;
संबोधुनियां मग सर्वांनां बोध तयांनीं दिला,
धनीण तुमचा मानुनि सारे हिच्या विचारें चला;
नंतर सांगुनि सुटी तयांनां देती आश्वासन,
पुरणपोळिचें लवकर देऊं सर्वांनां भोजन;
गुरांस चारा, पाणी पाजा, ' नाइक ! ' राखण करा,
थकून आलों, आतां घेतों मी विश्रांती जरा.

ग्रंथ संग्रहालय
काव्य 9068
26-12-33
९९३८

( ११ )

तंव रंगूच्या जवळ येउनी हळुच सखू बोलते,
हितगुज तीचें या समयाला होतें बहुमोल तें;
" येत्ये आता लोभ असू द्या, मैत्र तुला म्यां दिला,
मैत्र नव्हें, ह्यो जीवच माजा समज तुला सोपला;
येंच्या संगें आनंदानें नांद, सुकाची रहा,
सतंजीव व्हा ! सुपूत व्होतिल, काय् ह्मणे त्ये पहा;
फावऱ्या येळी मी बी येइन् बसायला तुजकडें,
माजें ह्मननें गुपित असू द्ये, आवरुन् धर ह्ये रडें; "
गळां पडुनि तंव रंगू वदली, " अपुन् येत जा बरं !
माया लावुन् मला कदी बी धेवु नका अंतरं. "
हातीं धरुनी सखूस मग ती दारांतुनि बोळवी,
पदरें डोळे पुशीत आली, संताजी समजवी;
मग हौशीनें दूधभात हें जेवण त्यांना दिलें,
हौशी गेली, नवें जोडपें माडीवरि पातलें.

( १२ )

माडीवरती ढण् ढण् जोती समईतुनि तेवती,
मऊ बिछायत आणि बिछाना, लोड, तिवासे किती;
भिंतीवरुनी हस्तकलेचीं चित्रे, ऐने तसे,
समईजवळी मेज एकलें बैठघाटी असे.

तयावरोनी गृहलक्ष्मीची छाया ती शोभली,
ही रंगूची सवत असावी सुंदर तैशी भली;
इथेंच पाटिल सही कराया बसत असावे कदा,
म्हणुनिच दिसलें लक्ष्मीपायीं कलम्-दान तें तदा!
भांगरवाडीमधुनि शोभलें हें घर बंगलेवजा,
नवें जोडपें त्यांत विराजे आज कराया मजा.

बिछायतीवर मेजाजवळी ती रंगू बैसली,
समोर तीच्या सन्निध बसले पाटिलही त्या स्थलीं,
हंसत मुखीनें शेलारांना पानविडा मग दिला,
पण रंगूचा रंगुनि मुखडा रसहि गळीं उतरला!
मेजावरचें चित्र तियेनें निरखुनि तें पाहिलें,
"ह्य कोन?" असें धन्यास पुशिलें, नवल तिला वाटलें;

आलिंगोनी, सुधा पिवोनी, लीन मुखीं होउनी,
हनुवटि धरुनी, गहिंवरुनी ते वदले मृदु भाषणीं:—
"ह्य कोन बरं? त्येच ह्य! अता समजलं ना तुला?
सर्गातुन् ही आज उतरली! आज भेटली मला!
किति वरसं गं टाकुन् ग्येलिस! असं करतं का कुनी?
इक्ता रुसवा? अन् माज्यावर? नको नको साजनी!
तुजाच ना ह्यो? तुजा नवं का? तुजा! तुजा! गं तुजा!
रंगेल्याला, येक जिवाला, तुटातुटीची सजा?—
अन् कुठवर तो आनिक भोगू? किती भोगिली पहा
आता मजवर करुना—ममता—करुन् इथं तू रहा!—"

( १३ )

अश्रुमलिनमुख होउनि पाटिल जवळ बिछान्यावरी
देह समर्पण करुनी पडले कळवळुनी अंतरीं.
रंगेलीच्या करपाशाचा गळयास वळसा पडे;
" असं रडायचं असलं तर मंग् मी नाई जा गडे ! "
" काय करू गं मला तिचा तो इसर पडं ना कसा !
इच्यार करतो, मात्त्यान् व्होतो याकुळ जिव हा असा ! "
" इसंर पाडिन्, झाकन् घालिन् सर्व्या दुक्कावर
पन् धिरं धिरं ह्ये व्हईल् समदं, धीर धरावा तर;
येकदाच मी सांगुन ठिवत्ये, नाई यिसरायचं,
डोळयातुन् ह्ये पानी मुन्शनि नाई गाळायचं,
दुक्कासटि का सुकासटी म्या जिवास जिव ह्यो दिला ?
जवळ हाये ना ? आवडत्ये ना ? सांगा सक्या मला. "
तों प्रेमाला भरतें आलें, धरिली कंवटाळुनी,
रंगूचें मुख झांकुनि गेलें मधुर मधुर चुंबनीं;
" खबूतराचं जुळून आलं पायलंस् ना ह्ये जुळं ?
त्या प्रीतितलं चाखुन् घ्ये तू अम्रुत ह्ये निव्वळं !
आवडत्येस् का नाई याची जाली ना खातरी ?
तू प्रीतीची जोत जागती ! जोत जिवाची तरी !
अंगामदला भाइरला तू परान माजा जनू,
धनीन माजी,–या समद्याची,–अनूखी काय् मी म्हनू ?

येड्यावानी बडबडनारा पन् ह्यो संतू तुला
आवडतो का ? अंत्रामीचं उग् ड कर तू मला. "
तंव नयनांतुनि गळे जिव्हाळा. "पद्रात् घ्यावं मला."
ह्या मृदु वचनीं हृदयीं झुकली, विरघळली कोमला !
वामन ह्मणती "परम आवडी अपुली अपुणां असे,"
सुधेंत ह्या जे तत्व बिंबलें वसुधेंतहि तें दिसे.
कंठालिंगन देउनि रंगू तन्मय ती जाहली,
कुसुमशरानें पुष्पधनूची प्रत्यंचा ओढिली;
वेलमोगरा चढला होता तेथिल सज्जावरी,
प्रफुल्ल होउनि सुगंध त्याचा खेळे ह्या अवसरीं;
हेच कुसुमशर, चहूंकडोनी त्यांचा वर्षाव हो,
ते संताजी शेलारच कीं घोरपडे ते अहो !
युद्धाच्या गर्दींत मिसळतां ओळख पटली नसे,
सादृश्यानें ही उत्प्रेक्षा ओघाला येतसे;

( १४ )

ज्येष्ठाची सुरुवातच होती, वादळ ये धांवुनी,
वेगें झंझावात धुराळा, कचरा ने वाहुनी.
वातावेगें वांकुनि पिंगा तरु वेली घालिती,
कातावुनि तीं भुतें धुळीचीं गरगरती, धांवती;
काळ्याभोर अशा मेघांनीं तारांगण झांकुनी,
चमकति चम्चम् समशेरीसम त्यांतुनि सौदामिनी;

सळ सळ सळ सळ आवाजानें तिरप्या शिरप्या किती,
शुद्ध रुप्याच्या रसाप्रमाणें धारा त्या लोटती;
वारांमधुनी गारांचाहि सडसा वर्षाव हो,
काहूरच तें लागुनि राहे सतत शिळंधार हो !
हां हां ह्मणतां–पाणिच पाणी–जलमय सारें दिसे;
क्षणांत सारा ताप निवाला, विझले आहे तसे,
पहांट समयीं तुफान सारें थकुनिच जणु थांबलें;
उभा न्हाणिला निसर्ग सगळा, टपकाति बिंदू भले,
जिकडे तिकडे निर्मल, हिरवें गार, सुमंगल दिसे;
नवजीवन तें मिळुनि जगाला प्रसन्नता येतसे.

( १९ )

प्रभात झाली, पूर्व केशरी शेल्यानें शोभली,
शेलारांच्या नव युग्मांतुनि जाग तदा वागली;
“ झोप सुकाची आली नागं ? बरं हाये ना अता ?
काल गळाली व्हातिस् ना तू मजसंगं बोलता ? ”
मुरका मारुनि, चुंबुनि त्यांनां हंसत वदे कोमला:–
“ लइ दिवसा ह्या आनंदाचा दिवस मला उगवला !
वहाटूळ पन् काय् वो जबरं ! काय् वारा ! अन् इजा !
गडगडनं, अन् मुसळधार त्यो पाउस ! केली मजा !

काय् सांगू राजसा ! किती पन् ह्यो जिव संतोसला !
जिकडं तिकडं गार, तजेला, आनंदच कोंदला ! ”

त्या प्रेमाच्या स्वानंदांतचि त्यांस मिठी मारिली;
अन् गालांची गोड न्यहारी तिनें दिली, घेतली !

संताजीच्या पूर्वी उठली, रंगू ये खालती,
सूर्य उगवतां तरुच्या छाया पुढें पुढें चालती;
धनीण होउनि गृहकार्यांचें सूत्र तिनें घेतलें,
तिचें सुवर्तन गांवकन्यांनीं नमुन्यासम मानिलें.

## लेजिम —

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी–मन प्रफुल्ल झाले
छन् झुन्, खळ् झण्–झण् खळ्, झुन छिन, लेजिम चाले जोरांत !

चौघांनीं वर पाय उचलले
सिंहासनिं त्या उभे राहिले
शाहिर दोघे ते डफवाले
टप ढुम्, ढुम् ढुम्, डफ तो बोले, लेजिम चाले जोरांत !

दिवटी फुरफुर करूं लागली
पटक्यांची वर टोकें डुलली
रांग खेळण्या सज्ज जहाली
छन् खळ्, ढुम् ढुम्, छन् छन्, पट् ढुम्, लेजिम चाले जोरांत !

भरभर डफ तो बोले घुमुनी
लेजिम चाले मंडल धरुनी
बाजुस, मागें, पुढें, वाकुनी
खळ खळ, छन् छन्, झण् छन्, खळ् झन्, लेजिम चाले जोरांत !

डफ तो बोले, लेजिम चाले
वेळाचे त्या भान न उरले
नाद भरान गुंग नाचले
छन्नन्, ढुम् ढुम्, खळ छन्, ढुम् ढुम्, लेजिम गुंगे नादांत !

सुगी

सिंहासन ते डुलूं लागलें
शाहिर वरती नाचुं लागले
गरगर फिरले लेजिमवाले
छन् छन्, खळ् खळ्, झणणण, छन् छन्, लेजिम गुंगे नादांत!
दिनभर शेतीं श्रमुनी खपले
रात्रीं साधी लेजिम चाले
गवई नलगे सतारवाले
छन् छन्, खळ् खळ्, झणणण, छन् छन्, रात्र संपली नादांत!
पहाट झाली, तारा थकल्या
डफवाला तो चंद्र उतरला
परी न थकला लेजिम मेळा
छुन् छन्, खळ् खळ्, लेजिम खालीं;—"चला जाउं या शेतांत!"

—श्री. बा. रानडे.

---

## सुखाचे क्षण—

इतुक्या लौकर येइ न मरणा
मज अनुभवुं दे या सुखक्षणां
फिरुन पहांटे डोंगरमाथा
घ्यावे काजू येतिल हाता
किंवा पोफळि शिंपुनि दमतां
मज आलिंगूं दे रविकिरणां

वझऱ्या[1]वरती न्हाऊनि पाणी
गावीं मी कुणबाऊ गाणीं
पेज पिऊनी पोवळीं[2]तुनी
झोंपुनी जरा सुखवुं दे मना
निसर्ग–गो–वत्सांशिं रमावें
दिवसभरी श्रमकरित रहावें
तिखट कढीनें जेवुनि घ्यावें
मासळिचा सेवित स्वाद दुणा
पडत्या किंवा सायंकाळीं
गुंतावें भावांच्या जाळीं
वेणुस्वरांची काढित आळीं
मज उकलूं दे आंतील खुणा
रेंदेरा[3]चें ऐकत गान
भानहीन मज मोडुनि मान
चुडतां[4]च्या शेजेवर पडुन
भोगुं दे मूक निस्तब्धपणा
रात्रीं समईशीं वाचावी
ज्ञानेशाची अमृत–ओवी

---

१ उंचावरून खालीं पडणारा जलप्रवाह

२ पोकळीच्या पानाचें बनविलेलें पात्र.

३ माडी काढण्यासाठीं माडावर चढणारा मनुष्य.

४ नारळीच्या झाडाचीं पानें.

कवितास्नेहें वात जळावी
उजळीत मनाचा द्वैतपणा
कुळागराची गर्द सावली
त्यांतच माझी खोप सानुली
निद्रेविण स्वप्नांच्या आळी
रेखीत भोगुं दे सरळपणा
फूलपांखरें अनंत माझीं
बनुनी, मी सेवावीं ताजीं
हृत्सुमनें आनंदामाजी
नाचवीत पांथांच्या नयना.

—बा. भ. बोरकर

---

## खेड्यातील घराकडे–

[ मोठ्या उत्सुकतेनें शहरवासी विद्यार्थी आपल्या खेड्यांतील घराकडे जात आहे. ]

खुणा गांवच्या दिसूं लागल्या स्पष्ट मला लोचनीं
उडे किति खळबळ हृदयांतुनी.
देशमुखांचीं हिरवीं सुंदर शेतें हीं शोभती
वाडगीं त्यांत दिसूं लागतों.

---

५ पाण्यानें समृद्ध असलेली नारळीच्या झाडांची व पोफळीची बाग.

**वा. भा. पाठक**

माळावर पातलों लागला दिसूं गांव–कोस हा
काय तरि मौज कथूं मी पहा !
ही चोंहिकडे पसरली दिसे हिरवळ
तें लांब दूरवर नदिचें जल निश्चल
हे कळस अलिकडे देवांचें देउळ
वट–पिंपळ ते–आणिक दुसरी शोभे वृक्षावली
त्यांत तीं घरें गडप जाहलीं.

गुरें वासरें दिसूं लागलीं चरतांना या इथें
गुराखी तस तयामागुतें.
बाळपणीचे मित्र यामधें माझे असतिल किती
दृष्टिही आश्चर्यें लाविती.
किती आदरें खुल्या दिलानें मजकडेच धावती
रीत ही प्रेमळ यांची किती !
‘ काय राव होता पुण्यामधीं किति दिन–
खबरबात आह्मा सम्दा द्या सांगुन–’
गोड भाषणें हीं त्यांच्यांतिल ऐकुन
मोठ्या प्रेमानें मी त्यांचा निरोप तो घेउनी
चाललों पहा पुढें हर्षुनी

पाउल पुढतीं एक टाकतां हृदय मुदें हें उडे
त्यांत ही विचारावली उठे.

## सुगी

जायाचें हळु परसाच्या त्या मागिल दारांतुनी
कसें सर्वांनाही चुकवुनी.
असतिल ताई भाऊ खेळत 'हुप्पि' तिथें अंगणीं
मौज मी देइन ही उडवुनी !
चोर-चोरुनी मी मागुति हळुं जाइन
तो सागर-गोटा वरचेवर झेलिन
आश्चर्यें बघतिल वरती सारे जण
माउलीस मग थक्क कराया आह्मी जाऊं कसें
धूम ती धाव घेउनी तसें
बघतां बघतां मारुतिचें हें देवालय लागलें
चित्त किति परि चंचल जाहलें.
चाफा दिसतो स्पष्ट आमुच्या येथून परसांतला
पहा किति उंच तरी वाढला.
माळवदावर उभें राहुनी अरे परंतू असें
पाहतें मजकडेच कोणसें !
हं-कळलें-ही तर माझी ताई गडे
किति रोखून दृष्टी पाही ही मजकडे
घाईत सांगण्या गेली आईकडे
दारीं येईल माउली अतां ओवाळाया मला
पूर्वींचा बेत विफल जाहला !

—वा. भा. पाठक.

## खेडेगांवांतील सकाळ—

पहाट झाली, मंद समीरण गीत गाउं लागला
विहंगम साथ करिति त्याजला
प्रशांत समयीं अशा चिमुकल्या जीर्ण झोपडींतुनी
श्रवणि ये मंजुल गीत—ध्वनी
कृषिवल—युवती कुणी दळाया बसली जात्यावर
मुखानें गीत गात सुस्वर
आम्रतरूवरि करूं लागली साथ तिला कोकिळा
आपुला गळा करुनि मोकळा
लागली हंसाया होंच उषासुंदरी
सुप्रसन्न दिसतो निसर्ग गिरिकंदरीं
प्रमुदीत जाहले शेतकरी अंतरीं
स्नानादिक प्रातर्विधि करुनी, नांगर धरण्या करीं
निघाले अपुल्या शेतावरी.
गुरें घेउनी वनीं चालली शेतकऱ्यांचीं मुलें
ठेवुनी खांद्यावरि कांबळें
हूड मुलें हीं काळिसावळीं, आणि बावळीं जरी
शरीरीं कंटकता बहु परी
गोफण फेंकुनि वृक्षावरलीं उडवीती पांखरें
चरावितां गाई अन् वांसरें
सदैव फिरती रानोरानीं, भीति न लव मानसा
खेळती खेळ वनीं स्वैरसा

# सुगी

हीं शेतकऱ्यांचीं मुलें वानरापरी
ओलांडुन जाती क्षणांत डोंगर, दरी
कधिं स्वैर भटकती डोंगर माथ्यावरी
भूक लागतां भाकर खाती बसूनियां तरुतळीं
न त्यांना बंधन अगदीं मुळीं.

कृषिक–योषिता कुणी निघाल्या हळू हळू नदिकडे
घेउनी मृत्तीकेचे घडे
कुणी गोवऱ्या थापुं लागल्या चिमुकल्याच अंगणीं
झाडिती अंगण अपुलें कुणी
घेउन हातीं विळे, चालल्या शेतावरती कुणी
कराया भाताची कापणी
उत्साहानें उठुनि पहाटे, कुणी धन्यासंगती–
आपुल्या मळ्यामधें राबती
डुलवितो समीरण मंद मंद हा मळा
पिकलेला दिसतो यांत गहूं, जोंधळा
धनि करिल कापणी घेउन हातीं विळा
खेड्यांतिल हें दृश्य पाहुनी प्रसन्न होते मन
नको तें शहरांतिल जीवन.
निळसर, गहिरे, सभोंवताली उंच उंच डोंगर
त्यांमधें हें खेडे सुंदर
निवडुंगाचे या खेड्याला कांटेरी कुंपण
बांधिलें व्हाया संरक्षण

शेतांमधली अरुंदशी ही पायवाट पाहुन
गमे, पहुडली कुणी नागिण
झुळझुळ वाहे पलीकडे ती प्रशांत जलवाहिनी
रिझविते जणूं गान गाउनी
हे बजरंगाचें देवालय चिमुकले
पावित्र्य जगाला दर्शविते येथले
वनदेवताहि दावितें विभव आपुलें
खेड्यांतिल हें वैभव पाहुनि विचार येतो मनीं
नको ती शहरांतिल राहणी.

—दत्तात्रय गणेश जयवंत.

---

## 'हिङ्गणी' एक ओसाड खेडें—

ओसाड पडिक त्या खेड्यांतुन हिण्डलों
पाहून अवदशा मनीं फार कष्टलों
भङ्गली वेस अन् गांवकूस कोसळें
जाहलीं ओस राउळें, घरें, देवळें.

कुणि 'पवार' नामे उदार संस्थानिक
हा इनाम त्याचा गांव असा लौकिक

## सुगी

भुइकोट तयाचा वाडा भक्कम भला
तो अजून दावी निज विभवाची कळा.

जीं पराक्रमी सरदार–घराणीं जुनीं
यत्पुरुष स्वातंत्र्याचे झाले धनी
शिवबासह ज्यांनीं राष्ट्रकार्य साधिलें
दिल्लीस कैकदा शह ज्यांनीं बसविले.

स्मारकें तयांचीं जिवंत हीं एवढीं
बावडी, दुर्ग, देवळें, हवेल्या, गढी
मावळे मऱ्हाठेशाहीचा भास्कर
अन्धार मातला पूर्व वैभवावर.

निज इतिहासाची आवड धरुनी मनीं
जिज्ञासू बनुनी बघूं स्मारकें जुनीं
धनदौलत त्यांची कलाप्रीति, दानत
ही खेडेगांवांतून फिरूं पाहत.

* * *

हतवैभव धनिकापरी गांव हा झुरे
जनवसतीवांचुन भकास दिसतीं घरें
मजसमान कोणी भेटतांच पाहुणा
दावितो त्यास निज ऐश्वर्याच्या खुणा.

# गणेश हरी पाटील

हा जीर्णजनक जाहला जराजर्जर
गणगोत न जवळीं शुश्रूषे तत्पर
मायेचीं त्याचीं मुलें त्यास सोडुनी
तीं पोटासाठीं गेलीं देशोधडी.

*   *   *

खेड्यांतुन आलों आपण सारेजण
सुत आपण त्यांचें ठेउन मागें ऋण
फेडल्यावांचुनी ते न कुणा सद्गती
अवलोका भेटुन त्याची हीनस्थिती.

पूर्वजक्षेत्र ते, जन्मभूमि आपुली
वडिलांस आपुल्या होति तिची साउली
दर्शनें तिच्या गहिंवरून येइल मन
स्मृतिचित्रें मागिल पाहतील लोचन.

भासेल सुसंस्कृत नागर चित्तास ती
रमणीय आणि हृदयङ्गम पूर्वस्थिति!

—गणेश हरी पाटील.

## कापसाचें शेत—

कापसाचें शेत माझें हो फुलोनी शुभ्र सारें
भासती हे कीं नभींचे खालिं आले सर्व तारे
मूर्त लाभे हा अम्हां कीं दौलतीचा दिव्य ठेवा
मौक्तिकांचा वा हिऱ्यांचा त्यापुढे हो काय केवा !
फुल्ल झाल्या कापसाच्या या अशा शेतांतुनी जी
हिंडताना साभिमाने कल्पना हो गुंग माझी
भासते कीं चालतोंसे तारकांच्या पुंजजालीं
जेवि चाले अंबरीचा हासरा तो चंद्र भालीं
फुल्ल झालें शेत ऐसें डोलतांना मंद वातें
हा जगूं हेलावतो हे मूर्त कीं क्षीराब्धि वाटे
खोप माथीं त्यांत शोभे मेढ मागें टेकण्यासी
शेषशायी विष्णु जेवी शोभतों कीं या निवासीं
ये उषा देवी शुभांगी रंगुनी ती सुप्रभातीं
आणि हर्षे वेंचुनीया तारकांचे नेइ मोतीं
तेवि संगे मैत्रिणींतें घेउनीया प्रीतराणी
वेंचुनी आणील सारें पीक गेहा गात गाणीं
मूर्त ऐशी संपदा कीं नित्य माझ्या येत गेहा
आणि माझी हृत्सखी ती होइ वेडी हर्षुनीया
येइ भावें एक लक्ष्मी कीं दुजीतें भेटण्याही
हेंच सालोसाल देवा, मागणें ना अन्य कांहीं.

—'किशोर' चव्हाण.

## भाताच्या मळ्यांत—

हळु मळा झुळझुळे सळसळत्या भातानें
जणुं झराच अवखळ खिदळत जललहरीनें !
चहुंकडे हांसतो चिमणा सागर हिरवा
कुणी ह्मणोत इरलीं—फिरतीं इवल्या नावा.
किति उदार सागर लपवि न कधिंही मोतीं
नवतुरे तरंगाति खालीं, भवतीं, वरतीं.
मृदु संगीताचे येति मधुनि मधु सूर
जलदेवींचें जणुं गान, लावि हुरहूर !

दे पार्श्वभूमि, जरि भिन्न, रम्यता चित्रा
या उभारिलें का ह्मणुनी तारायंत्रा ?
हे स्तंभ उंच नच—विजयें गाति निशाणें
" कां कळेल हृदया, बुद्धि सहज जें जाणें ?
मृदु डुलती भातें, वाजवि वायु सतार
परि गीत निरर्थक धरणीलागीं भार !
या तारा अमुच्या—पाश ! बांधिले देश
आणितों क्षणोक्षणीं विविध रम्य संदेश ! "
ये रमत पांखरूं एक—चिमुकलें
तारांवरि झाडुनि पंख—बैसलें

हळु शीळ घालितें मंजुल रंगुनि नादीं
संदेश ऐकुनी कीं तीं गाणीं साधीं ?

—वि. स. खांडेकर

# उंसांच्या मळयांत–

कांठा पाशिल रान – त्या नजिकचीं नांगूरलीं वावरें
वागा आंतिल आक्रमूनि, पुढती जेव्हां शिरावें त्वरें
तेव्हां मागिल कोपऱ्यांत दिसती मोठे उंसांचे मळे
ज्यांच्या थेट वईवरी उगवती सीताफळें, आंवळे

मोटांच्या विहिरी किती – पन्हळ वा क्याऱ्या तयां जोडुनी
पाण्याचा करिती सदा पुरवठा, – राहे कशाची उणी ?
गोरेला 'ढवळ्या' मलीन 'पवळ्या' दो-सांजही जोतुनी
हेंगाडीं परि गोड घोळत म्हणे गाणीं 'गुजाबा' गुणी

त्याचें बेढब चंद्रमौलि विलसे सीमेवरी खोपटें
जाई टाकुन 'कारबारिण' तिचें 'तान्हें' तिथें एकटें
त्याला सोबत झुंजती, हुदळती केरामधें कोंबडी
राखाया सगळ्यास कोण दुसरा 'मोत्या' प्रमाणें गडी ?

कंटाळूनि कधींमधीं फिरकला जागेकडे या कुणी
ताजा थंड कसा न इक्षुरस तो ओतील स्वीयाननीं ?
थोडासा रुचिभेद कां न म्हणुनी चाखीला तो आंवळे ?
जातां आंबुनि जीभ काय कार्धे तो सोडील सीताफळें ?

भवानीशंकर श्री. पंडित.

---

## मळ्यांत जातांना—

ठेउनी प्रेमें, प्रेमें फडक्यांत,
भाकरी–भाजीचा बेत.
चुरियले वरती, वरती मोलाचे,
जोंधळी, पापड उडदाचे.
टाकिलें वरती, तिखट मसाल्याचें,
ओतलें तेल करडईचें.
सुटाया पाणी, पाणी तोंडाचें,
लोणचें घालुनि आंब्याचें.
आठवण करुनी, करुनि घातली ती,
भाजि ही सगबहिणीघरची[१].
बांधुनी मोदें, त्वरित न्याहरीला,
घरधनी माधवरायाला.
नेसली अंगी, अंगि आवळून,
नाटिचें[२] लुगडें तें छान.
लाविलें भालीं, भालिं कुंकवाला,
भूषवी पतिच्या भाग्याला.
घातले पायीं, पायीं पायतणा,
दाविते भीती पापिजना.

---

१ सख्या बहिणीप्रमाणेंच एक मानलेली बहीण.

२ सुती लुगड्याची जात.

# सुगी

कटीला खोंवी, खोंवि टोंकदार,
निंदणीचें खुरपें प्यार.
डोकिवरि पाटी, पाटि न्याहरीची,
धरियली वाट शिवाराची

मंजुळा चाले, मार्ग आक्रमीत,
मन तिचें पतिच्या हृदयांत.
मंजुळा चाले, सांवरीत पदर,
फडफडे वाऱ्यानें फार.
मंजुळा चाले, चाले तंद्रींत,
माधवाचें चिंतन करीत,
मंजुळा चाले, चाले मोदांत,
वाटलें मनीं अकस्मात,
मनाला वाटे, उशिर आज झाला,
सूर्य हा डोईवर आला.
क्षणाला वाटे, खंतचि जीवाची,
टळलि कां वेळ न्याहरीची !

काय तरि बाई ! मी मोठी नष्ट !
चालले तिकडे किति कष्ट.
उगिच मी गेलें, पाटिल वाड्यांत,
गमविला वेळ बोलण्यांत.
कुठुनि ती आली, आलि 'ठमाबाई',
उशिर हा म्हणुनि मला होई.

## सोपानदेव चौधरी

लागली शींव, आतां शहराची,
दिसे बाभूळ एकदांची.
मळ्याची खूण, खूण अतां दिसली,
कानिं ही लल्कारी आली.
मारि लल्कारी, लल्कारी कोण ?
मंजुळे, तुझा पंचप्राण.
मारि लल्कारी, "मोटेच्या बैला,
चालरे, [1]आवड हा भरला."
मारि लल्कारी, "ढेलाऱ्या बैला,
चालरे, आवड हा भरला."
"सांवळ्या, तूंही, चाल जरा वेगें,
उमलवी केळीचे पोगे.
तुम्हीं हा घ्यारे, घ्यारे शाबास !
हिरवळ्या [2]दादरचा घांस.
तुम्हा दोघांना, तगडे बनवीन,
घालुनी सरकीचें दान.
सांवळ्या तुजला, आणिक मोतीला,
रेशमी गोंडे माथ्याला !
हयाती राहो, राहो तुम्हाला,
[3]सवारूं पुढच्या पोळ्याला.

---

१ तीन वाफ्यांचे एक पाटगे, व वीस पाटग्यांचा एक आवड.

२ विहिरीच्या पाण्यावर वाढलेला कडबा.

३ शृंगारू.

तुम्हां दोघांची, डौलदार शिंगे,
बांधु मग त्यांना बाशिंगे.
केतकी अपुली, फुलेल तो गहिरी,
केवडे त्याविन मग नम्री
सांचलें सूत, सूत मंजुळेचें,
बारडोली–चरख्यावरचें.
विणू मग झूल, झूल तुम्हांलागीं,
रंगही देऊं नारिंगी.
फुलांचा छान, छान बहर काला,
आपुल्या पळस पांझऱ्याला.
गाउनी गान, गान माधवानें,
फेडिले कष्टाचे उसने
जाहली वेळ, वेळ न्याहरीची,
बघतसे वाट मंजुळेची.
सोडली मोट, मोट एकदांची,
अरोळी दिधली जोराची.
चाल रे सोन्या! सोन्या [४]बारकरी,
सोडुनी दे आतां बारी.
चाल रे, सोन्या! सोन्या! लवलाही,
सांवळ्या मोतीला नेई.

---

४ पाणी वळविणारा.

## सोपानदेव चौधरी

तयांना आधीं, आधि पाज पाणी,
वाजवी शीळ गायि गाणीं.
"नेउनी बांध, आंब्याच्या खालीं,
तयांना पाचोळा घाली.
अरे पण अजुनी, अजुनि मंजुळाई,
कशी ती आज येत नाहीं."
मनाशीं म्हणतो, म्हणतो फिरफिरुनी,
बघतसे तो माळ्यावरुनी.
मंजुळा माझी, दूर दिसे कां ती,
खेडच्या त्या [5]सगरावती.
नव्हे ती कोणी, कोणि तरी पोर,
जातसे [6]लौकीच्या पार.
अरे ही येई, चाहुल कानांत
फडफडे कडवा शेतांत.
मंजुळा आली, आली कडब्यांत,
गुदगुल्या झाल्या हृदयांत.
उतरला खालीं, माळोच्यावरुनी,
रंगला आवडत्या गानीं.
तोंच ती आली, जीवाची राणी,
मंजुळाई गोजिरवाणी.

---

५ पाय रस्ता. ६ ओढ्याचें नांव.

## सुगी

टपकती बिंदू, वदनीं घामाचे,
मोल तें श्रम-सौंदर्याचें.
हांसली मोर्दें, सांवरीत पदर,
चावुनी दंतीं तो अधर.
तीच मग बोले, बोले लाजून...........

—सोपानदेव चौधरी

---

## कुणब्यांची राणी—

गाइ एकली कोण अशी ही वावरिं हिरव्या या ?
येइ चांदणी नभातली का स्वर्गीतें गाया ?
गीत गोडसें वस्त्राहि तीचें गाई कसलेसें
कंकण नादीं होउनि वेडा वात मंद हासे;
चमके हातीं विळा रुपेरी, घुमे तान वदनीं;
पहा फेकित मधुन लकेरी त्या रानोरानीं;
किती माधुरी ! कोण देवते ! पळ तव जाइ घरीं;
खुळा जाहला चंद्र अंबरीं, उतरे बघ आम्रीं;
प्रेमें हासत वदली मंजुळ जादूची वाणी
दुःखीहृदयी झोपडीतल्या कुणब्यांची राणी !

—कुमार गायकवाड.

---

## शेवन्ती—

शेवन्ती, तुज केंव्हां पाहिन या डोळां ?
स्मरणिं अजुनि मूर्ति असे तव मराठमोळा

तव नाजुक अङ्गकान्ति
पिवळी जणुं शेवन्ती
खुलवी किति कुन्ददान्ति—तीळ तव कपोला !
लीनपणें हळुं वदणें
गालीं मधु खाळि पडणें
स्थिर खालीं पदिं बघणें—करिशि मुग्धलीला
पदर नीट डोईवर
मन्द चरणगति सुन्दर
वळण तुझें फार मधुर—खचित तूं सुशीला !
रीत तुझी किति निर्मळ !
हाकेला ‘ जी ’ मञ्जुळ
मार्जें राखण्यांत कुशल—तव स्वभाव भोळा
दिन गेले किति निघून
भगिनी विनयवति अजून
भेट न ये तव घडून—जीव हो भुकेला
कधिं बसतां एकान्तीं
रुचिर दिसति तव आकृति
रङ्गविते स्मृतिचित्रें—कल्पना विलोला

सुगी

‘ वेलीवर जेविं फूल
तव कटीस तेविं मूल ’
वत्सल हें चित्र भूल—पाडिते मनाला !

—गणेश हरी पाटील

---

## मंजुळा—

विस्तीर्ण वडाच्या दगडी पारावरी
मी बसे एकदां चिंतित कांहींतरी
कितीतरी वडाच्या पारंब्या लोंबती
या पारंब्यांची गर्दी झाली किती
मंजुळा पोरगी कुणबी जातींतली
बांध्यानें नीटस आणि काळिसांवळी
वय तिचें असावें तेरा चवदा तरी
ती पारबीच्या खेळे झोल्यावरी
जरतारी पातळ नव्हतीं ती नेसली
नोहता फुलांचा गजरा वेणीवरी
वर्णही नोहता जरी केतकीपरी
निर्व्याज खुलेपण हीच तिची माधुरी
चरणीला लावुनि पांचचार शेरडें
ती मधुनी मधुनी पाही त्यांच्याकडे

गुणगुणे खेडवळ गाणें कांहींतरी
घे खुशाल झोंके हलत्या झोल्यावरी
तिज माहित नव्हते शहरांतिल चोजलें
लाजणें मुरडणें असेल मग कोठलें !
मी नांव तियेचें पुशिलें जेव्हां तिला
खणखणीत सांगे " मज म्हणती मंजुळा "
मग विचारिलें मी " तुम्हि भांवडें किती ! "
ती झटकन् सांगे " मी आणी श्रीपती "
शेतांत श्रीपती गेला राखायाला
आणिलीं शेरडें मी हीं चारायला.
बोलुनी एवढें झोंके चढवायला
नेटानें लागें भान नुरे मग तिला
ती खुल्या दिल्यानें झोंके घे मंजुळा
सानंद कौतुकें बघत उभा मी तिला
तिज काय वाटलें न कळे परि थांबली
निमिषांत उतरली झोल्यावरुनी तळीं
क्षणभरी मजकडे निर्हेतुक पाहुनी
मंजुळा पळाली क्षणार्धांत तेथुनी
मजपुढुनी गेली भरकन् वाऱ्यापरी
शेरडांत मिसळुनि जाई निघुनी दुरी
त्या खुलेपणांतिल आठवीत माधुरी
मी किती वेळ तरि बसलों पारावरी

सुगी

ती निर्भय वृत्ती निर्हेतुक पाहणें
तें गोड खुळेंपण अमुच्यामध्यें उणें
येतसें स्वतःचें कृत्रिम जीवित मनीं
कष्टलों परतलों घरास मग तेथुनी
हा प्रसंग घडुनी किती वर्षे लोटलीं
भंवताली सारी कृत्रिमता माजली
परि मधुनी मधुनी आठवते ती मला
खेड्यांतिल साधी आणि गोड मंजुळा

—काव्यविहारी.

---

## ही कोण ?—

गोफण घेउनि करीं
उभी ही कोण माचव्यावरी ?

कणसामधलें मोति खावया
झाक खगांची येई स्थलिं या
पांगोरा तों वाजवुनीया
हाकी वरचेवरी

शेव डोइवर चंद्रकळेचा
बाणा करिं परि रणमर्दाचा
गोफणितां कर बिल्लोराचा
ध्वनी चित्त मम हरी

## विष्णु भिकाजी कालेत

कैऱ्या कणसें पोटरकींचीं
हिरे माणकें हींच आमुचीं
भाग्यदेवि कां शेतकऱ्यांची
घेउनि ये भूवरी ?

तीक्ष्ण नजर शेतावर फेकुनि
देई उजळा पिकालागुनी
वेळ कंठिते मधुनी मधुनी
गात गात भल्लरी.

धांड्यांचीं सळसळतां पानें
घे कानोसा स्थिर चित्तानें
तोंच दिसे घरधनी, तयानें
लाजे बहु अंतरीं.

—विष्णु भिकाजी कोलते.

---

## इरलेवाली—

वेडिवाकडी घेउन वळणें
नागिण धांवे जणुं रोषानें
वाफा टाकित धांपापरि ही गाडी धडधडते
वरतीं भिडली घन घनमाला
धूम धावते दिग्भागाला
रथचक्रांच्या घरघरीपरी गगनीं गडगडते

# सुगी

कड्यांकड्यांवर गार चारिवर
झडून राहे सरींवरी सर
जिकडे तिकडे जलधारा ही सारखि खळखळते

बांधावरतीं ऐशा वेळीं
नाजुक बाला काळिसांवळी
हादरणारें शिरिंचें इरलें धरण्या धडपडते

वेष तिचा तो सुंदर साधा
लपवुनि गोंडस ठुसका बांधा
दावी यौवनकांती किति ती अंगीं मुसमुसते

"आज ना जरी धावुन येतिल
लावाणि कसची शेतीं होइल
सासुसासरा उपाशि देवा", ऐशी पुटपुटते

हातिं रोप परि गाडी निरखुनि
बघतें अपुलें आलें का कुणि
दिसता लज्जालहरी शरिरीं निमिषीं थरथरते

प्रेमदृश्य हें बघण्या चोरुनि
गुपचिप वाहे नदि इंद्रायणि
स्वभालिं न असें भाग्य ह्मणुन का मनिं ही इळहळते!

—वा. गो. मायदेव.

## सुंदरी–

ही पाण्यालागीं घेउनि हंडा शिरीं । चालते विहिरिकडे सुंदरी !
हा विहिरीवरतीं आम्रवृक्ष डोलतो
कोकीळ ओतुनी कंठ बाग भारतो
कुइकुइ मोटेचा शब्द मधुनि चालतो
आसूड सप्पादिशिं ऐकुनि वैलांवरी । सुंदरी विचके हरिणीपरी !

पायांत साखळया स्वच्छ शुभ्र शोभती
गरगरित पोटऱ्या यौवनास दाविती
किति माळिणचोळी खुलून दिसते हातीं
"र बाळा र बाळा" गीत चाललें वरी । लाजते ऐकुनि तें सुंदरी !

विहिरींत उतरुनी पटकन हंडा भरी
मग कष्टें चढवी एक एक पायरी
तों भिरभिरणारी मोट थांबली वरी
कांठाशिं कसा तरि हंडा आणुनि करीं । बघे कीं चढविल का
कुणि शिरीं !

तों तेथ धांवुनी चटकन ये कोणसें
"शिरिं हंडा देतों, मोल काय" पुसतसे
"हें काय" ह्मणत तों मोलहि ह्मणि घेतसे
लव रोषानें, लव लज्जेनें हांसरी । जाय मग हंडा घेउनि घरीं.

—वा. गो. मायदेव.

# मोटेवरील सुन्दरी–

हीं प्रभात-कालीं राहुनि धावेवरी
हांकते मोट कुणी सुन्दरी

खोविला निरीवर पदर कसुन कटितटीं
झळकते कान्ति किति नील-आरुणी पटीं
ही मराठमोळा सुरत रम्य गोमटी
आसूड उडवुनी मजेंत वाऱ्यावरी

चालला पाट उधळीत तरंगावली
ती खिलारजोडी डौलामधिं चालली
खुळखुळति घुंगरूं गळां, नादली तळीं,
कुरवाळुनि प्रेमें तयास वरचेवरी

मधु गान मुखानें चाले मञ्जु-स्वनें
मोहनें भारितें चराचराचीं मनें
वाहतो समीरण मन्द, लुब्ध गायनें
डोलते शिवारीं पीक मुदित अन्तरीं

हांसली उषाही भावगीत परिसुनी
लाजून कोकिळा चूर जाहली मनीं
निज-गान थांबवी, पाहे डोकावुनी
ती पर्ण-राजिमधिं लपुनी आम्यावरीं

आनंद

ही ऋद्धि-सिद्धिची मूर्त जणूं गोजिरी
कष्टते सुखानें येथें पाणी भरी
नांदते मुदें या कृषीवलाच्या घरीं
तें गृह नच भासे खाण सुखाची खरी !

—राजस

---

## गुराखीण—

उभार ठेवण, काळेली तुळशिच्या परी, नजर धावरी
कळा नारिची अंगलटीं उभवली पुरी, नवल नौधरी
होती माहेर घरीं.

इरलें माथ्यावर घेउन पोर साजिरी, चालली दुरी
गुरें नेतसे हिरव्याशा रानगींवरी, करुन न्याहरी
पाउस सरिवर सरी.

आरद्रातुन गगन वरतुनी ये कोसळून, गर्जना करून
मुसळे पाणी चहुंबाजूला भरी भरून, डोंगरावरून
उपाय गेला हरून !

धुंदकाऱ्यातुन बिजली जा टकमका लवुन, कीं ढगा भिउन
दिवसा ढवळ्या आसपास जाय काजळुन, दस् दिशा भरून
सूर्यदेव जा पळून.

## सुगी

पाणझडीला डोय देत गायवांसरें, कांपरें भरे
बैल बांड उसळुनी पळे, नाक फुर्फुरे, अंग भोंवरे
गुराखीण बावरे!

सकाळपुन गारठून गेली गुरांसवें, गळत आसवें
वैवै धावत घालितसे हांक लाघवें, किन्नरी रवें
जीव परी माळवे!

गुरां मागुती चार हांक धांवली पुरी, धडकली उरीं
गढूळ नाले तुडुंब धांवत पिशापरी, गर्जती दुरी
कोण पोचविल घरीं?

अखेरीस वळविलीं तिनें गायवांसरें, मागुती फिरे
अंधेरी झांकिते पुरी रात किरकिरे, धीरहि नुरे
पल्याड होती गुरें.

उतरे भर-वेगाच्या ओल्यामधीं जरा, येइना तिरा!
वळुन मात्र पाहती गुरें वाढल्या पुरा, देत हुंबरा,
हाल चाल ना जरा.

*　　*　　*

उजाडलें—! पण खडकावर काय तें दिसे? कावळा असे.
गिधाड दुरुनी झांप घेत येउनी बसे, हालवी पिसें;
पुढती गावूं कसें?

—आनंद.

## पाटीवाली—

ओझें डोईवर,
चाले भरभर,
वळकट बांधियेलें बाळ पाठीवर.
भुकेलें तान्हुलें
रडाया लागलें,
'उगी उगी' ह्मणत ती माता वाट चाले.
रात्र सर्व दिन,
नाहीं ऊन तान,
बाळमुखा मधें मधें लावी शुष्क स्तन.
उन्हानें सुकली,
कळी करपली,
लटलटां मान हाले खालीं पडलेली.
गळालें शरीर,
उरीं धरी पोर,
डोळ्यांतुनी पडतसे पावसाचा पूर.
तीन आणे गांठीं,
एकुलतें पोटीं,
दोन जीव घरीं आले, प्राण आला कंठीं.
"नाचण्याचें पीठ,
तेल, तिख मीठ
दिडकीचें;" मनीं योजी जेवणाचा बेत.

## सुगी

“दूध वाटी भर
आणोनी लौकर
पाजीन या सयाजीला माझ्या पोटभर.”
गोड आशा मनीं,
ह्मणतील धनी
“लई कष्ट झाले तुला” मुख कुर्वाळूनी.
दिसें काय परी!
धनी उभा दारीं
असे पुरा झिंगलेला, डोळे तो वटारी.
“बघ तो कलाल,
काढ पैसे, चल,”
बिलगला अंगालागीं पुरा तो बेताल.
गाठींचे घे पैसे,
मारी तिला ठोसे,
उपवासी बाळ, भरी कलालाचे खिसे.
बाळा आली ग्लानी,
मूर्च्छित जननी,
पिता सर्व रात्र गाई वेडीं वेडीं गाणीं;
* * *
मौज पाही जगत्पिता अनंत नेत्रांनीं.

—पां. जि. सबनीस.

सूचनाः—वाचकांनीं घाबरू नयें ! ही राधाकृष्णाची कविता नव्हे.

# गोपाळ

[ गोपाळ अथवा भोरपी ही एक Gipsy लोकांसारखी जात आहे. गोब्या पाण्यांतला मासा व गुरेंढोरें विकणें हेच यांचे नाव घेण्यासारखे धंदे. आठ महिने या लोकांचा कोंकणांत धुमाकूळ असतो. पावसाळे दिवसांत या लोकांचे काय होतें कोण जाणें. ]

रस्त्यापाशीं निशाण रोवुन मांडितसे देवता
तंबाकूला चुना लावुनी खात बैसला स्वतः
झाडाखालीं चूल, चिरगुटें, चार खुंट रोविले
उशास रेडा ह्मैस, भोंवतीं आई बाइल मुलें
चांद, रवी, चांदिण्यादिकांचा जडाव याच्या घरा
सुगंध देई खुल्या महाला अंब्याचा फुल्वरा
वृक्षवरांची गर्द पालवी, खिडक्यांची झालर
बुंध्यामधले रातकिडे गातात गीत सुस्वर
अल्ल्या रातीं गोडा मासा डोहांतिल मारणें
दिसा डोंगरांतून, गवत सर्पणादिका चोरणें
पेटवून परसा निजलेलीं जिथें मुलें माणसें
तिथे झब्या कुत्र्याला येई भुंकायाचें पिसें
आठ दिवस हा एका स्थानीं नांदणार ना कदां
रस्त्याच्या लगत्यान बिऱ्हाडें बदलणार सर्वदा.

—आनंद

---

## संध्याकाळीं—

सोनेरी किरणें उधळूनि चोंहीकडे
दिनराज निघोनी जाय पश्चिमेकडे
दिवसाचीं कामें सारूनि रानांतली
माणसें गुरासह परताया लागलीं
सर्वकाल यंत्रासमान ज्यांचे जिणें
दिनभरी त्यांमधें मिसळोनि वागणें
वीट या क्रमाचा मज पुरता येउनी
बाहेर झटकलें गुमान गावांतुनी
मज बाजाराची पेठ नको वाटली
खोट्यांचा सौदा नित्य ठरे ज्या स्थळीं
दृष्टिही वळेना नगरोद्यानाकडे
ज्यांमाजीं भरली कृत्रिमता चहुंकडे
बाहेरिल सृष्टी सुंदर आणी खुली
पसरली डोइवर निळीझार पोंकळी
वायूच्या लहरी तरंगती त्यांसवे
स्वच्छंदें उडती किति पक्षांचे थवे
वाटेस दुतर्फा गार पिकें पसरलीं
शेतांत शाळुचीं ताटें कणमाळलीं
जांभळा फुलोरा खुले हरभऱ्यावरी
बेफाट पिकानें कोठें लवल्या तुरी

# काव्यविहारी

आसमंतभागीं सगळ्या शेतावरी
गडगंज संपदा यावेळीं पसरलीं
अति उदार ऐशा खुल्या निसर्गापुढें
तुलनेला टिकती काय धनिक बापुडे
हे तरंग उठले तयाक्षणीं अंतरी
कुंपणाकडेनें जातां मार्गावरी
घोळका चालला पुढुनी गांवाकडे
कौतुकें वेधली दृष्टी मम त्याकडे
डौलांत चालली पुढें चार गायरें
दुडदुडति मागुनी दोनतीन वांसरें
ओढाळ त्यांतलें इकडे तिकडे पळे
वाटेवरि उठेत धूळ कुठं त्यामुळें
मालीक तयांचा कुणब्याचा पोरगा
राखिली निसर्गें सुंदर ज्याची निगा
एकल्या फाटक्या जरि कुडत्याचा धनी
किति पाणिदार तो शहरी पोरांहुनी
तेजस्वी डोळे तरतरीत चेहरा
कुळवंत मराठा दिसे पोर तो खरा
तत्क्षणीं मनाला पटलें त्या पाहुन
जात ही इमानी भारतास भूषण
शाळेंतिल शिक्षण त्यास नसे यामुळें
मुरडतील नाकें कोणी शहरांतले

परि संतोषी जी वृत्ति यास लाभली
भोगिती काय ती दुबळी शहरांतलीं ?
दुबळ्यास लुबाडुनि सभ्यपणा मिरविणें
सर्वदा नीतिला पायतळीं तुडविणें
हे सद्गुण मिळती जया शिक्षणांतुनी
तें खुशाल जावो जगांतुनी लोपुनी
वाहवलों ऐशा विचारांत तोंवरी
गायरें, वासरें गेली निघुनी दुरी
मज अंधाराची जाणवली चाहुल
परतुनी यावया वळवीलें पाउल
रानांत पसरली उमाप जी संपदा
ती डोळे भरुनी पाहियली एकदां
चाललों दृश्य तें घोळवीत मानसीं
मुळिं कळलें नाहीं वाट ओसरे कशी.

—काव्यविहारी.

---

## रायबा—

जाडें भरडें धोतर अंगीं कुडतं साधें एक
डोक्यावरतीं लाल पागुटें दिसतें काय सुरेख !
पायीं जोडा, हातीं काठी, देह कसा भरदार !
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.

## गोपीनाथ

काया शिणली फार उन्हानें झाली कडक दुपार
थोडथोडक अंतर नाहीं, कोस तेथुनी चार !
बुधवाराच्या दिवशीं त्यांच्या गांवाचा बाजार
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.
पाणी नाहीं कुठें मिळालें, होती खडतर वाट
सुरकुतल्या तोंडावर वाहति घर्मजळाचे पाट
हंगामाचे दिवस, मिळाया गाडी मारामार
असे रायबा सोडुन आले आज इथें घरदार.
आठवड्याचे आणायाचें बुधवारीं सामान
गावकऱ्यांच्या भेटीगांठी, कामें दुसरीं आन
आणि गड्यांचा टाकायाचा देउन आज पगार
तरी रायबा सोडुन आले आज इथें घरदार.
"लई गुणाचा पांडू माझा मन लावी लिहिण्यांत
खेड्यावरती आला नाहीं आठदहा दिवसांत."
तळमळतें मन म्हाताऱ्याचें इथें जीवनाधार,
म्हणुनि रायबा सोडुन आले आज इथें घरदार.
शिणली काया तरी मुखावर आनंदाचा भाव
म्हाताऱ्याची किती खरोखर पोरावरती माव
पाहतील ते डोळे भरुनी अपुल्या पांडोबास
मुखीं घालुनी तन्मातेनें दिधला प्रेमळ घास.
कुरवाळोनी त्यास विचारून देतिल खर्चायास
आणि रायबा संध्याकाळीं जातिल मग खेड्यास.

—गोपीनाथ

## तीन बालमित्र--

१

मला नेटावर नेउनी जयानें
दिले दांडू तासून वाकसानें
तोच माझा प्रिय बालमित्र आज
मग्न अपुल्या धंद्यांत होत रोज,
दूर सडकेच्या बांधुनी कडेला
एक खोपट सानसे रहायाला
बसे फुंकित तो दिवसरात्र भाता
गाडिवानांचा लोभ त्यास आतां.
जरी गेलों मी चुकुनि त्या दिशेनें
बघुन येई मज पुढें आदरानें
आणि आठवणी काढुनी सुखाच्या
अश्रु आणी तो नयनिं उभयतांच्या.

२

सुखें घालुन हातांत हात ज्यानें
मला नेले शेतांत आदरानें
तिथें कणसें तोडून घोंसदार
दिला हुरडा खायास गोड फार
तोच माझा प्रिय बालमित्र आज
त्याच शेतामाधि बांधुनी पडाळ

दिसे रात्रंदिन राबता पिकांत
क्षणाचाही त्या असे ना उसंत
कधीं काळीं जरि भेटला मला तो
उभयतातें आनंद फार होतो.
शेतवाडी मग पाहुनी तयाची
वाट धरितो मी आपुल्या घराची.

३

स्वभावानें तो शांत फार होता
आणि म्हणुनी सर्वास सौख्य-दाता
असे त्याचें घर माझिया समीप
गट्टि जमली आमुची अपोआप
आज झाला तो बडा कामगार
मिळे वारा त्या कचेरींत गार
भेट त्याची आमुची होत नाहीं
खुलें हृद्गत झाल्यास होत नाहीं.

—वा. भा. पाठक

---

## विरोध—

पुढें भरतीची लाट धडधडून
पाय तळिंचा वाळूस ने धुवून
डुलति झाडें वरि चार नारळींची
रांग मध्यें तेत्रढी खोपटांची.

# सुगी

जवळ होड्या बाजुला दोनचार
वाळ तेथें खेळती सभोंवार
नांव एखादी बरी बांधलेली
सान वाहुनि संसार धन्य झाली.

गडी बाइलही कामकरी सारे
संग पाण्याशी आणि वरी वारे
खपुनि रात्रंदिन काय मिळे त्यांना
अजुनि माशांनी टोपली भरेना.

पुरा लंदन आक्रमी नांव त्यांची
माल उठवी बाजारपेठ साची
आज फिरतें जळिं कोणतें जहाज ?
माल जातो कोणता कुठें आज ?

पांच मजली प्रासाद कोण बांधी
मार्ग सौख्याचे कोण नवे शोधी
काय यांचें त्या अर्ध-नग्न देहा
किती अज्ञाना साधितोस दावा !

कोण नांवें दैवास ठेवणार ?
कुठें होते जाणते तदा थोर ?

—अविनाशचंद्र

## आजचा मराठा—

गंजला
आणि गांजला
मराठा पुरता
शरिरास लागला विस्तव कढतां कुढतां
ना मिती
खपावें किती
सतत शेतांत
दे पीक न धरणीमाय उभ्या वर्षांत
भाकरी
भुकेला तरी
कशाची भाजूं
हृदयाचें झालें उलटे मात्र तराजू
सांभाळ
आणि प्रतिपाळ
करावा कैसा
गोठ्यांत गोजिरी चार, गळ्याला फासा
पाटील
पगडिला पीळ
आमुच्या साजे
ह्या ह्याच गावचे राजे, आजे पणजे

# सुगी

त्या तिथें
आमचीं भुतें
भटकती आता
हातात घेउनी हृदय, बोचतो कांटा

भंगून
आणि खंगून
ह्या मधे अंत
नाशिवांत कंठणें आली काळी रात

ही रात
मनाला खात
कशी जाणार
तो कोण कधीं येणार दाद घेणार ?

—अज्ञातवासी

## सुगी—

पूर्णेच्या पाण्यामधी पार नाहिला[1]
येऊन दया देवानं हा दिला कौल चांगला

चौफेर बनावर फळाफुलांच्या सरी
डोईवर गेली बाई औंदाच जवारी तुरी

मी राखण करते बरं किती नेहमी
शेतांत नांदते आतां येईल घरा लक्षुमी

मळणी अन् उफणी तशी कवां सोंगणी ?
फिरफिरू जशा नागिणी ग आम्ही मग साऱ्याजणी.

कां उगाच हसता मला अहो घरधनी
येईल घरी मोत्यांची मग रास भरूं रांजणी.

सासरीं सरू, गोठ्यांत जसं वासरूं
ती येइल मायघराला, घरट्यांत जसं पाखरूं !

येउंदे बरं सांगते भराला सुगी
वाहीन माय अंबाई पहिलीच तुला वानगी[2].

—ना. घ. देशपांडे.

---

१ नदीच्या कांठावरील पारावरून पुराचें पाणी गेलें तर तो शुभशकून समजला जातो.

२ धान्याचा नमुना; तो प्रथम देवाला वहात असतात.

# सुगी--

देवदयेनं, साल रगड हें, असं कारभारिण
पाहिलं नव्हतं जल्मांतुन
एक वार ये, वाघमळीच्या वावरांत तूं जरा
पिकावर फिरव नजर गरगरा
[1]इळसपुरीचा बघुन जोंधळा चकित् मनीं दारिका
होशिल, येत चालला चिका
टरटरा निघाले कणिस पोगऱ्यांतुन
वर झुललं फुल्लर पिवळं हळदीहुन
जणुं किसुन फेंकलं सोनं देवाजिनं
हिरवा, हिरवागार, बैसला पाट तुझा वाणि[2]चा
तसा तो गहिवरला राइचा
चवळवेली तळास खालीं खेळत फोंफावल्या
वाघ्या शेंगांच्या लोंबल्या
[3]ढासण करितां वसान[4], शिंपी[4], दवडी[4], किरडू[4], तसा
मातला शेवरा[4]बि कांहिंसा
तुझ्या हातच्या तूरसरीवर भुंगे नादावती
खालती फडारली ती किती !

---

१ जोंधळ्याची एक जात.  २ हुरड्याचा
३ अडचण  ४ गवताच्या जाती

सुरेश

लइ वाढुन गेली पळकाठी सरसर
खतमाथीं माझ्या पागोट्यापोतर
टचटचांत खालुन वरती कैरी-भर
तुरळक, तुरळक, अतां लागलं दिसूं कुठें पेंभडू[५]
पाहतें ' चांदरात ' ग पडूं !

भरून जाइल घर गोठ्याचं न्हातं अर्धं तसं
' सुगी ' ही यंदाची भरकस

चारुन रानीं बैल आजला, उद्या दुपारांतुन
येइन पोरगसि घेउन

घटकाभर वावरांत मागं, वाळ पांखरं बरं
भिरकुनी गोफण ही भिरभिर

बाजारहाट तर करावयाचा खरं !
हो, सोनवडीचा उद्या हाट ना बरं ?
उभि करून गाडी येतां रस्त्यावर
सण-बाजारा उरकुन, मग मी किनार ज्याची भली
आणिन तुज लुगडें इरकली.

—सुरेश

---

५ कापसाचा फुगा

## सुखी जीव—

१

मज नकोत ते फुकट मिळाले लाख
कष्टार्जित भाकरि एक

जणुं चमचमती स्वेदबिंदु नाचून
भाळावर आनंदून

मज अशी मिळो ल्याया तारुण्याची
मुंडावळ सौभाग्याची

हें लवथवतें हिरवें हिरवें शेत
फुंकून पवन डुलवीत

बाजूस उभी आंबेराई दाट
इवली ती पाउलवाट

घेऊन किती वळसे गोजिरवाणा
हा ओहळ वाहे चिमणा

पाहून पुढे गोड उसाची वाडी
होतील माणसें वेडी

अन् ओलवितांना पाणी
मोटेवर गावी गाणी
कंठितो अशी जिनगानी
सुखसाम्राज्यीं रमतों आह्मी दीन
उद्यमांत रात्रंदीन.

२

ती दूर उभी पहा माळच्यावरती
राखण्यास माझी शेती
पटकूर जुनें लेउन माळिणचोळी
घरधनीण साधीभोळी
खोचून असा पदर आडवा नीट
एकटी उभी ही धीट
किति गोड हले काया, घेतां फिरकी
गर गर गर गोफण गिरकी
नाजूक तिची गोडस गोफणफेक
ती कुळवंताची लेक
काढून गळा उंच पाखरावाणी
शेतांत पांखरें हाणी
न्याहरीस ओढ्याकाठीं
करितांना गप्पागोष्टी
मुरकून हासते ओठीं
खाऊन सुखें तिच्या हातची रोटी
दे ढेकर भरल्या पोटीं.

—राजा बढे

## समाधान—

सारखं जरी संसारीं धावणं भरारा
लाभला तुझ्या पितींचा एकला निवारा

आणले घरा गवताचे कोवळेच भारे
दावणीत गाई गोऱ्हे बांधलेत सारे
मी अजून घामाझोकल, आवरी पसारे
कामगार मी शेतीचा भागलो दुपारा

भूक लागली ग आतां आण पुढें थाळी
कोरडीच भाकर दे, ही सांजयेळ झाली
काळजी नको गरिबांचा देवसखा वाली
आणशील पाणी प्याया थंडगार हारा

काळजी नसोत, सुखानें ये निजून राही
नीज गोड आली आतां, ही मला, तुलाही
भोवती धन्याची आहे दाट आंबराई
शांत रात गाणं गातो मंद रानवारा

—ना. घ. देशपांडे.

## अम्ही तर जंगलचीं पांखरें–

शेत माउली अमुच्यासाठीं, अम्ही तिचीं लेकरें
अम्हांला कमी कोणतें बरें ?

उजाडतां दिन खावा भाजुन रोज तुरीचा हुळा
जरा का जठराग्नी कावला

वाणीच्या कसदार नारळी हुरड्याची ती चवी
पांचही पक्वान्ना लाजवी

माघांतिल चवदार हरभरा ऐन रकाण्यावरी
थोडकी काय मजा दे तरी

खुडुनि मुगाच्या शेंगा कधि कोंवळ्या
जातां येतां खाव्या पाट्यांतला

गुळचट शेंगा चवळीच्या वा जरठ पोपटी भल्या
लागती भाजुनि किति चांगल्या !

तोडावीं कधिं बोरें कांटे काठीनें दाबुनी
हिंडतां कधीं रानींवनीं

मध चाखावा गोड मोहळा वरच्यावर झाडुनी
फिरकतां दाट चिलाटींतुनी

किति सेवावी जंगलच्या त्या मेव्याची माधुरी
फळें तरि खावीं तीं किति तरी

## सुगी

पसरुनि पानावरी शिदोऱ्या सोडाव्या तरुतळीं
करावी दुपारची न्याहरी

बाजरिची ती गोड शिळी भाकरी
लसूण कांदा चटणी मग ती वरी

मारित मिटक्या यथेच्छ खातां सुधा तुच्छ बापुडी
सुरांची पडेल नवल न उडी !

स्फटिकासम हा निर्मळ झुळझुळ जवळ वाहता झरा
ओंजळी भरून प्यावें जला

गुरें पोहणीं घावीं काळेशार डोह पाहुनी
डुबावें तुडुंब जालें मागुनी

गर्द सांवली आंब्याखालीं काय मजा लोळतां
वायुची झुळुक गार लागतां

फुंकुनि पावा नाद भरावा गोड वनीं सुस्वरीं
चढोनी रातीं माळ्यावरीं

धनवंता-घरीं काय कुणा या सम
लाभतील हीं गोड सुखें निरुपम

महाल-माडी अम्हां झोपडी रान सदा मोकळें
अम्ही तर जंगलचीं पांखरें !

—पांडुरंग श्रावण गोरे.

## आगोट—

( चाल—नव हिंदराष्ट्र झेंड्या )

आगोट पगा आली
जुमिन ही न्हाली.

कडक उन्हानं जुमिन तापली
कुठंकुठं नांगरणि व्हायली
पन वळवाचं पाणी प्याली
गार कशी झाली.

वरतुन आतां सुटला वारा
[1]कळहंगनांत कोठून निवारा
[2]जित्राबाला गोठा अपुरा
यंदांच्या सालीं.

परथम् बाकीची नांगरणी
मंग करूं ती पाळि–ढाळणी
तद्दुताक मागुती पेरणी
येळ नामि आली.

वळिव सारका येतच राही
आठ दिसांपुन उघाड नाहीं
म्हून जुमिनही उपळुन कांहीं
गेली भंवताली.

---

१ खराब झालेला चारा. २ गुरेंढोरें.

सुगी

हिरवा चारा दिसूं लागला
भारि अम्हांला हरीक झाला
जित्राबाचा तसाच अपुला
देव सदा वाली !

—वि. म. घुले.

---

## पावसाचें गीत—

पाउस आला दणादण—बैल चाले सणासण
फुल्लय् शेल्यांचें गोत
नव्लाख नांगराचं जोत,
पाउस आला सरीवर—पानी झालं शेतभर
जर झाला काळोख् मीट
चिखली व्हवुद्यारं नीट
आलं आलं सरवट—दाट आली घनदाट
आवण रोवारं खोल
तणाला मोल्याचं मोल
आला आला सरावण—शेत वाढे तण, तण,
वाजव पाण्यावर गीत
पिकव त्या नादावर शेत
आला आला गौरी सण—दाणा धरे मण मण
धर मुरदुंगाचा फेर
धारण पैशाला शेर
उजाडला आशवीन—पनवेल झाली जून

सपसप चालूंद्या बीळा
दसऱ्याचा चंदन टीळा.

*　　*　　*

आला आला मंगशीर—भात झालें खळ्याभर
करतां सरकारी भर
शेत्याच्या नयनीं नीर ! !

—आनंद

---

## पेरणीसाठीं--

कराया पेरनी—तुम्हि चाला व ! समृद्याजनी
भाजीभाकर लौकर रांधा
मोहन, ठेसा त्यावर कांदा
पालवामधीं चट्कन् बांधा
न्याहारि घेऊनी—तुम्हि चाला व ! समृद्याजनी
आभायांतुन मोत्यावाणी
मिर्गाचं गं ! पडलं पानी
म्हने बापुया सोबत काहाडुनी
करा पेरऽनी—तुम्हि चाला व ! समृद्याजनी
पऱ्हाटिचं बीं घे तूं पारे !
तूं घे जोंधे, तूं धर गोऱ्हे
चाडं भोघं—व्हा गं म्होरे
घेउनश्यानी—तुम्हि चाला व ! समृद्याजनी

काहुन अशि ही करता वट्वट्
पाय आपलं उचला चट्पट्
चला भुरं वावरांत झट्पट्
पांखरावानी—तुम्हि चाला व ! सम्धाजनी
उशिर न अक्षी लावा कांहीं
अटपा बिगिबिगि करा ग ! घाई
तठीं नाहितर माज्या पायीं
रडल धरधडनी—तुम्हि चाला व ! सम्धाजनी

—विष्णु भिकाजी कोलते

---

# पेरनीचा होका--

[ खालील कविता पूर्व खान्देशस्थ लेवापाटीदार शेतकऱ्यांच्या भाषेंत लिहिली आहे. शेतांत कामावर बोलावितांना आदल्या दिवशीं होका ( होकार ) द्यावा लागतो. सदरहू कवितेंत एका बाईनें ऐन वेळीं होका घेतला अशी कल्पना आहे. ]

चाल सोना येति कां वं माह्या घरीं पेरनीले
कुठलचा होका आला आज पेरनीचा तूले ?
काय केलि शाक परी तुन पातय नीतय
मिन ठोकल्या भाकरि केलि उडदाची दाय.
झालं काव सम्द तुह्य शेनपानी धोनं चोनं,
आज घरांतले शेति तुम्हिं जातां कोनकोन ?
काल संध्याकायी शेंतातज झांपड पडली !
ऐन वक्तावर लव्ह लव्ह धांवत मी आली.

एक बायको पडलि कमि म्हनून सांगते,
कर कर घाइ आतां सोना ! पाया मी पडते.
चार पांच रोज झाले सम्दा कामाचा कातोला[1]
कव्हा व्हईन पेरनी जिव व्हतो थोळा थोळा
आज येनार आहे ते हाकल्याले व तीफन[2]
एका झपाट्यानं शेत पार सगळं व्हईन
माह्य " आव्हान्याचं[3] " शेत काशि रेसमाची घडी
नाहि दिसनार गोटागाटा पह्याटिची काडी.
तुहे सरत्यावरले[4] हात — चपय तूं भारी
काय सांगू व सोनाई तुहि पेऱ्याचि बल्हारी[5] ?
दुसऱ्याच्या शेतावानि शेत नाही माह्य दूर
नको करूं अनमान परी[6] ! होका घे लव्हकर.
तुले संगातीन आहे सगबहीन सारजा
मंग शेतामधि करा तुम्हि खुपखूप मजा.
धारयाले[7] बह्यनोई[8] तुह्या येईम दूफारी
तुले पाहीसन करीन व खेसर[9] तो भारी
बांध न्याहारि, घे वटी, नको करूं येळ्यात्रानी,
माले लह्यनी[10] व्हईन तुह्या हाताचि पेरनी.

—सोपानदेव चौधरी

---

१ दग दग. २ तीन दांत्याचें पाभार. ३ शेताचें नांव. ४ दारान बांधलेले चाडे. ५ वहार. ६ पोरी. ७ लोड देण्याकरितां. ८ मेहुणा ९ थट्टा मस्करी. १० शुभदायक.

## निन्दणी--

तुमी–चाला चाला व !
जूरा कामकऱ्या
चून नी भाकऱ्या
खान्या घ्या सवं.
पडोन पावूस
वाढलं तनस
चार हिरवं.
भरलं वावर
झांकली सगर
निन्दाया व्होवं.
हातीं घ्या खूरपं
करा साफसूफ
समदी वाव.
बिगी बांधा भारे
गांवीं ईकूं सारे
येक्याच भावं.
लई केलं काम
भेटतील दाम
किती, काय् ठावं !

—भवानीशंकर श्री. पंडित

## भलरी—

भलऽरं, भलऽरं
भलरि दादा ! भलं गडि दादा !
तांबडं फुटलं झुंजूमुंजू
सुकीर चांदनी लाग्ली इझूं
थंड वात् कु्रतुया कुज्बुजूं
म्होरं हात् चालिव् जोसांत मर्दा
भलरि दादा ! भलं गडि दादा !
कापुर वोढ्याचं झुळझुळ पानी
पांखरांसंगं गावुनश्यानी
रंज्विल गड्या ! खेळिया[1]वानी;
न्हिरीचा खाउन् चल भाकर कांदा
भलरि दादा ! भलं गडि दादा !
बाच्या किर्तीची सुमरुन आन्
लुटायूला जावूं मोत्याची खान्
उपटुन काढूं कण्साळलं रान्
चला रात्र भिडवुन खांद्यास खांदा
भलरि दादा ! भलं गडि दादा !
शिवारिं जित्रा[2]प नागावानी
सळ्सळ् आवाज, डुलती फनी
डुइवर धरलं मोत्याचं मनी

१ गाणार खेळाडू जोडीदार; सोंगाड्या  २ पीक

## सुगी

कवळुन आनुं या वर्साचा सौदा
भलेरि दादा ! भलें गडि दादा !
कडूसा पडतां संपेल् पाळी
ढवळी व्हईल मोकळी का[3]ळी
इर्जीकीला मिळेल नळी[4]
काळ्या रातीला फुलविल चांदा
भलेरि दादा ! भलें गडि दादा !
इरबळ ठिप्काल डुईचें पानी
शिगेल खळें डोंगरावानी
भरत्याल कनगी, गंजी रानीं
खात्याल समदी प्वाटभर मलिदा
भलेरि दादा ! भलें गडि दादा !

—गिरीश

---

**इंजिक—**

गनबा हंडा हाय आपल्या गांवाचा पाटिल
आनिक कारभारि अट्टिल
माळ, गव्हाळ्या, पठार त्याचीं शेतें तीं पांगलीं
अवंदा हिवताचीं राहिलीं

---

३ जमीन ४ बकऱ्याचें मांसविशेष,

## वि. म. घुले.

इर्जिक त्यानं आंज घातली नांगरायची म्हुन
नांगर बोहिल्याति झाडुन
दिवसानं डोक नाहिं काढलं वर
हं जुपा आउतं अपापलीं भरभर
पांगून जाउं या सम्धा शेतांवर
व्हइन अशानं नांगरनीबी आज सांजपोतुर
नका करुं कसूर कोनी वरं !
गनबानं नइ यंदा सालीं माडि दिली उठउन
आणुन कारागिर लांबुन
घातामंदी नव्हत रिकामं कोनि नांगरायला
सम्दा हिवत अजुन व्हायला
दिवस चाललं भराभरा हे जवळ आलि आगुट
नाहीं हिवत व्हायला कुठं
न्ह्यारीला आम्टी ज्वारीची भाकरी
दहि मिळल् नाहिं तर ताक बरूबर तरी
तो बेत उजुन बी मंग दोन पाहरीं
संधाकाळीं तेऽलच्यांचा बेत जवा होइळ
किती हो मजा तवा येइल !
माडीमंदी नया थाट तो पंक्तीचा होईल
शंबरावर मानुस माइल
जिकडं तिकडं झळकतील ते हिलाळन् खंदिल
इर्जीकिला रंग येईल

सुगी

दिवस आपला हरकामंदी साऱ्यांचा जाइल
आनिक गांव फुलुन राहिल
पाटील गांवचा संबाइत आसला
वागता चालता लोकामंदी भला
देवानं नाहीं कमि क्यालं त्याजला
पीक येउंदे, शेतकऱ्याला ठूय ईस्वरा सुकी
मागनं नाहीं रे आनखी.

—वि. म. घुले.

## गोफणवाला—

भल्या माणसा गोफण माझी वाटे तुज कां उणी
जिवाची माझी ही स्वामिनी !
शेत मळीचें, सुंदर साचें, त्याचें मध्यंतरीं
वडाचें झाड माळवा वरी
पेरली बाजरी, ज्वारी, आणी तुरी
करकरीत भरल्या दाण्यांनीं या सरी
मन जातें निवुनी पाहुन फुल्लर तुरी
सकाळ–संध्याकाळ दिनभरीं राहुन शेतान्तरीं
वाळितो पक्षी मी कितितरी.
भूक लागतां कांदा, कैरी, अन् चटणी–भाकरी
बैसतों खातच माळावरी




भल्या माणसा गोफण माझी वाटे तुज कां उणी

—सुरेश.

नजर परी मम दूर अन्तरीं येता कुणि अवसरी
सांगतों तया, ' करा न्याहरी. '
उरलेलि ठेवितो वृक्षाच्या खांदरीं
जल गार पिवूनीं देतो ढेकर वरी
परि वावरतें मम चित्त सदा वावरीं
चाहुल येता मनीं काहुर, उठतों जों झडकरी
सोडतों गोफण ही भिरभिरी.
कधीं कधीं मी डुलतों पाहुन डुलतीं कणसें, वरी
चमकती दाणें मोत्यांपरी
कधीं कधीं चहुबांध फिरूनी गातों ' गुण गुण ' हरी
पुरा मम सुभाव देवावरी
कधिं उभा राहतों बांध–वारुळावरी
कधिं खात बैसतों हुरडा शेतान्तरीं
कधिं होय मनीषा माझी उमऱ्यावरी
कधीं तुरीच्या वा चवळीच्या शेंगा नेतों घरीं
जयांची धनीण भाजी करी.
संध्याकाळीं वाट पाहते कारभारिणी घरीं
तिच्याशी गोड शब्द मग करी
कुऱ्हाड खांदीं, कमरीं गोफण, भाकर बांधुन शिरीं
येतसे तसाच माळावरी
भर झोंप शिवारीं एकच माझी खरी
मग उठुनी चिलमेमधें तमाखू भरी
खाकरुनी सुरका एकच ओढी जरी

## सुगी

हुरुप अन्तरी, एक असाटी भरतों वरच्यावरी
दचक तो माझा सर्वा परी.
नहाट होता शीतळ वारा सुटतां मग सुरसुरी
वाकळी घेतों आंगावरी
जाळ करूनी अंग शेकतां येते मज तरतरी
बैसतों गातच कांहीं तरी
ती शुक्र-तारका येई क्षितिजावरी
तो राम-पहारा, राम नाम 'श्रीहरी'
जपतांच जळावीं पापें जीं अन्तरीं
दीन-मणीचें लाल तांबडें लपलेलें कंदरीं
तयाला नमस्कार मी करी.

—सुरेश

---

## मोटकरी-

ही मोट भरे भरभरा
चढे करकरा जी.
विहिरींत बघा वांकुनी
जरा धाकुनी जी.
पाण्यांत लई भोवरे
फेस गरगरे जी.
हे काम राहिले, करा
कसा कंबरा जी.

## ना. घ. देशपांडे.

थुय्थुई फिरे हा झरा
लावणी करा जी.
चौफेर बहरला मळा
खुले नवकळा जी.
काळींत दिसे हीवरा
गहूं हरबरा जी.
लवलवति कसें नाचरे
ओंबिचे तुरे जी.
ये सांजकाळ साजरा
चला रे घरा जी.
पन धनीन हय माहिरा
जीव घाबरा जी.
कुठवरी धरूं तर असा
तुझा भरवंसा जी.
कोवळा चढे मोकळा
राघुचा गळा जी.
राहिला कुठें तर दूर
सखीचा नूर जी.
झाकळले रानोवनीं
हसे चांदणी जी.
बांधून बैल दावणी
म्हणा लावणी जी.

—ना. घ. देशपांडे.

## मोळीवाला--

घ्या मोळी घ्याना, मोळी कावळ लई
खान्याबिन समदीं पोरं, घरिं करत्याती तुइतुई !
समजून जरा अंतरीं
द्या, पोटापुरतं तरी
म्या जरब मोलना तुम्हास सांगीतलं ?
द्यायचं काय तर सांगा मंग मोल तरी आपलं,
पोटास पीळ देउन
तोडली वांकवांकुन
विसरलों पारभर भूकतान सारखा
बिनमोलानं कां नाना मी इला होउं पारखा ?
पाटील गांवचं तुमी
लेकरूं आपलंच मी
पाठीवर मारा दोन खेटरं कसं !
पन मारुं नका पोटाला गरिबाच्या नाना असं;
ज्वारीच्या भळशा जरी
खातील ठोकुनी घरीं
मावली तिच्याहुन थोर पिरथमीमधीं
दिसतो ना कोनी माला, त्या पदरीं टाका अधीं !

—सुरेश.

## फेरफटका—

पाव्हनं, चला या जावुं फिराया तर्त
कधिंपून पाह्यली नाहीं अमुची ती बागाइत
हो जुपली गाडी, उभी असे भाइर
घ्या पागोटं अन् आतां अनमान काय म्हुन बरं !
ही पवळी जोडी राव आमुची पगा
लइ चपळाई पळण्याची, नव्हं सांगत कांहीं उगा
नच खूर लावती, पळतां जमिनीवर
अन् जशी धांव हरणांची तें घेती वाऱ्यावर
हा शिवार हिरवा इथुन असा आपला
त्या पल्याडच्या बाजूला जावूनशान् ठेपला
हो दिसूं लागला बाग आपलाच हा
जुपल्यात आज मोटाही, कुरकुरती कैशा पहा
ही मोसंबीची नवी लावणी पगा
धरला मोहर मिरुगाचा, फळ येइल म्होरं सगा
ही नागपुरी संतरी इथं लावली
तीं मधली समदीं झाडं फळभारानं वांकलीं
ही लहानग्यांनीं फुलं लावलीं बरं
लोंबती कसं पन् नामी ते केळीचे लोंगर !
मिरच्यांनीं धरली अतां नवी पालवी
नियमितशीर पाण्याची तरतूद तियेला हवी,

हा इथुनतिथुन रोपला दुध्या भोपळा
लइ पीक राव हें येडें, समदाच येढतें मळा !
ही येरंडाची हार, वाल त्यावरी
घरधनीण अमुची येते तोडाया शेंगा परी
हें जिवंत पानी इहिरीचें तर पगा
कधिं आटायाचें नाहीं, लइ पाझर कीं दांडगा !
या असे हतें या बसूं झोपडीमधीं
लइ पातळ माया केली, येतात एकदां कधीं
ही चिरलीं नामी गोड पोपयीच खा
त्या आंबट संत्री फोडी....पन कोन मारतें हका ?
हो चालत बोलत वाढुळ झाला लई
अन् असेल आतां झाला घरिं तयार स्वैंपाकही !

—सुरेश

---

## गरिबीचा पाहुणचार--

या बसा पाव्हनें असे, राम राम घ्या
कोनच्या तुह्मी गावाचें ! गाठुडें तिठें राहु द्या !
घोंगडी टाकली इठें, बसा तीवर
अनमान करू नका आता, हे समजा अपलें घर
वाढूळ चालता जनू, लई भागला
हे पगा काढलय् पाणी, आंघूळ कराया चला

आटपा बिगीनं जरा, ताट वाढलं
पाव्हनं चला या आता, हे पगा पिढं टाकलं
वाढली पगा ज्वारिची जाड भाकरी
निचितीनं जेवा आता, जायचं न शेतावरी
लइ सुगरण मपली बरं कारभारिण
किति अपरुक झालं हाए हे कांद्याचं बेसन !
लसणीची चटणी उजून पगा वाढली
ती मधून तोंडी लावा, लागती तिखट चांगली
चापून अता होउद्या, करु नका कमी
मीठ भाकरी गरिबाची घ्या गोड करोनी तुह्मी
इक्त्यात कसं उरकलं, हे नव्हं खरं
आनखी येक चतकोरा घ्यायला पाहिजे बरं !
का राव हात राखुनी असं जेवता ?
ए अगं वाढ की त्याना, हां ब्येस जाहलं अता !
हो झालच आता उठा, चला भाइर
घ्या हातावरती पाणी नी बसा पथारीवर
पाव्हनं नीट भितिला बसा टेकुन
हे खांड घ्या सुपारीचं, द्या तोंडामदि टाकुन
ही भरली चिलमीमदी तमाखू अहा
पेटली कशी पण नामी, झुरका तर घेउन पहा !
'जायचं' काय म्हंगता ? झोप घ्या जरा
जाताल उद्या का घाई ? छे बेत नव्हं हा बरा !

भारीच तुझी हे बुवा, जायचंच का ?
तारीख चालली वाया, गरीबाचं ऐकू नका
शेवटी निघालातना ? जपूनीच जा
गरिबाची ओळख ठेवा, या बरं, राम राम घ्या !

—ग. ल. ठोकळ

---

## उंद्या येदाळा--

उंद्या येदाळा—धन्याला सांगशिल्, मला मार करशिल्,
पानी पी पऱ्हाळा !

तूं ग धन्याची लालडी
कास घालशिल् कोरडी
मर्जी जाईल रोकडी
उंद्या सवाऽरी—ताटाला बसतिल्, दुधाचा रुसतिल,
बगुनी उऱ्हाळा.

तुला तहान लागली
भरल्या उन्हांत आनली
कां ग राहशी ऊगली
केलं चेटूऽकऽ—कुनाग सवतिनं, माझा ग रोखुन,
धरला जिव्हाळा.

झाली उन्हाळी दुगार
डोळां आली तिरमिर
पानी पी ग घोटभर
माझ्या मुखींऽची–घालून भाकरि, करीन चाकरि,
भरल्या दुकाळा.

बग झालाग वाडूळ
रुसायाची कां ही येळ !
घरीं वासरूं भुक्यालं
चलग ऽ जाऊं ऽ या ऽ–हसत नाचत, शेतांत खेळत,
धरुं नग अबोला.

—साधुदास.

## लुटारूंनीं म्हटलेलें गाणें–

वेळ किती ही नामी ! गोंधळ घालूं या मण्डळी
उगवला शुक्र नभोमण्डळीं !

हा मावळतीला चान्द जात भेटाया । हो
जङ्गलभर पसरे त्याची पिङ्गट छाया । हो
पाण्ढरी फटक ही उगवत लागे व्हाया । हो
चैतपुनव आजला, वाजवूं सम्बळ या देवळीं
उगवला शुक्र नभोमण्डळीं !

## सुगी

तळ असेलही उठविला गाडिवानांनीं । हो
घाटांतुन खळखळ जातिल गाड्या निघुनी । हो
मधु पडेल घुंगुरमाळांचा रव कानीं । हो
भण्डारा उधळून भरूं या खण्डोबाची तळी
उगवला शुक्र नभोमण्डळी !

ही अजुन घोरते किर्रकिर्र वनराई । हो
वेताळ गस्त नुकताच घालुनी जाई । हो
जाळींत वाघ कानोसा घेउन पाही । हो
गजर करूं देवाच्या नांवें, ' जय मल्हारी बळी !
उगवला शुक्र नभोमण्डळीं !

जाईल विझुन एकेक नभींचा तारा । हो
वाहील पठारावरी झुळुझुळू वारा । हो
येतील चराया गुरें रानचा चारा । हो
रामपहारा नको घडाया पाप हातुनी मुळीं
उगवला शुक्र नभोमण्डळीं !

जावोत सुखानें वाटसरू मुक्कामा । हो
पाप्यांना आम्हा क्षमा करो परमात्मा । हो
सत्कर्मि यापुढें येवो तनु ही कामा । हो
घरास जाउन मुलां माणसां भेटूं, उजळूं कुळी
उगवला शुक्र नभो मण्डळीं !

—गणेश हरी पाटील

## कोंकणचा शेतकरी-

" दे दे देवा भात भात, " शेतकरी गातात.

मंगशीराचा चंद्रम येतां मळणकरी जमतात
भात झोडुनी गोण्या नेती खोताच्या दारांत
अखिल वरिसभर शेत सजवितां शेती ये गोत्यांत
पांच मणाचा ये कमतावा मक्त्याच्या भातांत!!
भर-मक्त्या कारणें ओरडे खोत उभ्या गांवांत
अपशब्दांची राळ उडवितो रागाच्या तावांत-!

कांहीसा हिय्या करुनी शेवटला
रडव्या वाणीनें शेती पुटपुटताः—
" ऐका राजानू जन्माची कानी
घरांत ना कोणी येयाला पानी
मिरगाच्या[1] धरनें हे सांदे धरले
पासावाचोनी कोनी ना उरलें!
त्यांत-न्हई[2] फुटली-शेतावर घुसली—
रेताडापायीं[3] धरतरीच रुसली
रोपाचा झाला शेणाचा गोळा
कुजव्याचा आला रंग काळाकाळा

---

१ मृगापासुन.  २ नदी.  ३ जमीन.

वाइच बी न्हाई खंडहि आभाळा
त्यांतुन कोसळला घरट्याचा माळा!
इकतें होउन बी म्या तुमच्या दारा–
वतला तो दाणा, पिकला जो सारा!
भुस्काट पायलिचां खळ्यांत जें होई
तें बी आनोनी वत्तों तुम्हापांई!!"

* * *

वटवट ही ऐकून खोत तो जरा न होई शांत
मात्र जहाले कण भाताचे रोमांचित स्वांगांत!
लगेच, नंतर उंचावे ती रासहि हातोहात
कणाकणांतून असंख्य जिव्हा वदल्या या शद्बांतः—

" देवांचे अवघें लोपे गणगोत
फक्त जगीं राही खोताची जात
कोंकणचा शेती! नुस्ता नांवात!
पिकतें तें सारें खोताचें भात."

—आनंद

## कोंकणचा कुळवाडी--

( कोकणामधला एक कुळवाडी, गुळीचें ओझें घेऊन शहरगांवीं विकायला जात आहे. तो आता आलेल्या पैशांची माडी पिऊन तर्र होऊन येईल, अशा आशयाचा संवाद दोघा नणंद भावजयीमधें चाललेला आहे. कोकणच्या कुळवाड्याच्या आयुष्यक्रमावर प्रकाश पाडणारा हा प्रसंग या कवितेंत चित्रित केला आहे. कवितेंतली भाषा रत्नागिरी जिल्ह्यांतील उत्तरेकडल्या तालुक्यांत समुद्राकांठीं राहणाऱ्या कुळवाड्यांमधें प्रचलीत आहे )

" वंजि ! चालला चाकरमानी घेउन डोईवरी
गुळीचां ओझां विकाया शरीं
ठणकत होतां कपाल म्हुन् मी वांयूच चोळ्ळाय् चुना
येइना त्येच्या कंदी मना
मोडुनि जातां कटां मानेचां थोरल्या घाटयेवरी
चढतां उब्या सुळाच्या परी
दोंपारच्या निंबरांत पडते डोल्यांवर झांपड
तापल्या त्येलापरि ते कड
भाकरी वडाच्या खातिल पारावर
तीं गोरां गोरवां चरतां माळावर
लय लबुत् घालतिल उडीच गवतावर
आजुबाजुच्ये पांचपन्नास जमतिल् गांवूदकरी
सांगून येय सोय ती खरी.

---

वंजी–वन्सं, चाकरमानी–घरधनी, गुळी–उडदांच्या वेलांची वैरण, शरीं–शहरीं, कटां–कांटा, घाटयेवरी–घाटावर, निंबरांत–उन्हांत, गुरां गोरवां–गुरें वासरें, लबुत–लालचावलेलें, ग्वोड–गूळ.

ग्योडा सारखं पानी पिउनी शरीरावरी म्होरल्या
लागतिला सडकेला वायल्या.

*          *          *

फुलगांव्ह्याला मोप दुकानां मुसड्यांची चालती
म्हयमान् मंबयचे सवकती
बिया काजिच्या, कवटां, तिळ्या, आमसुलांचे पुडे
खप्तात् बोल बोलतां गडे!
काय शिपायां मिजास, अद्रुन् सतावती गांव्कारां
तोंडावर पडोच त्येंच्या शिरां!

*          *          *

आग पडो हरकांच्या भाकरीवरी माज मांजरा
कल्च्यान् बघा लागलाय् जरा
सांगुन ग्येले आज आणतां तुज खारी मासळी
पिरथुमित त्येंची ओकच भली"
"दादा ग्येला कश्या म्ह यताचि नाय वयानि कां तुज?
इली त्या माड्येची गो सुज
येइल, होउन ट्यर, इयेपर्टत हकडन् थकडन्, घरीं,
तुझं मंग इचार दुरच्या दुरी."
"जाळिं मेल्यांचीं, कश्या उघडती सडकेवर तिरकुटां
सोंपतिन कां भंड्गे पटपटां?

मोप–पुष्कळ, मुसड–मुसलमान, कवटां–अंडीं, अद्रुन्–मुद्दाम, तोंडावर शिरां पडो–तोंडावर काळें पडो. माज मांजरा लागणें–वाधणें, कल्च्यान्–कालपासून, पिरथुमित–पृथ्वींत, ओक–ओळख, सुज येणं–तलफ येणें, तिरकुटां–माडिचें दुकान, भंड्गे–भंडारी, सोंपणें-मरणें, मल्यान्–पुन्हा, मांगं-मागें.

सोपानदेव चौधरी.

वरी केलिवं वंजि ! याद ही, साद द्याच जाउनी
नको ती दश्याच बघया कुनी
मामंजि, दाजिबा, सासुबाय ह्या हत
झिटमिटल्यापासुन बसलिं अशीं मळणित
वाटती लाज हो माज जायची थत
जा ! जा ! वंजी ! मल्यान् सांगतां माजा सर्मतो जिव
आणा हो मांगे भोळा शिव. ”
—चक्रवाक्.

---

## पाह्यलं ग दारीं—

पाह्यलं ग दारीं—कां हंसून खुदकन् तरी ?
काल दुपारीं विहिरीवरी
होति एकटी तूं सामुरी
पाणी प्याया आलो परी

तोंच सुकुमारी
पाण्याची चरवी
तुझिया करवी—पडली धरणीवरी.

गांवरानिच्या आम्राइत
पिकला आंबा तूं चाखित
पहात होतिस ना जम्मत ?

फिरुनि माघारीं
आंब्याचा सगळा
रस ओघळला—तुझिया वक्षावरी.

## सुगी

बसलो होतो वरुळीवरी
अभाळ वरती गडगड करी
पाउस आला सरिवर सरी
चम्‌चमणारी
ती वरची बिजली
तूंच भासली—मजला सगरावरी.

परवां येइल पोळा—सण
आणिन परधान्या सजवुन
मुळिंही येउं नको गे पण
पुढल्या दारीं
मी येइन मागुन
हळूंच सांगिन—गुपित तुला सुंदरी.

होइल ना मग व्हावें तसें ?
नातरि होईल माझें हंसे
त्यांतुन शेजारी हे असे
संशयी भारी
कां मन बावरते ?
खळबळ उडते—सखये हृदयांतरीं.

—सोपानदेव चौधरी



' पिकला आंबा तू चाखित '

—सोपानदेव चौधरी.

# भिंगरी—

गरगरा फिरे भिंगरी–जशी–गरगरा फिरे भिंगरी !
लयू गोड सखूचा गळा
मैनाच म्हणूं का तिला
अंगावर नव्हती कळा–उरावर उडवित आली सरी
सारखी करी 'हुरहुरा'
हाणते सखू पाखरा
सावरून पदरा जरा–मळाभर फिरते ही साजरी
ये पिसाट वारा पुरा
ही घाबरली सुंदरा
ये माघारी झरझरा–मिळाली संगत मोटेवरी
"ये हरिणीच्या पाडसा"
मी सूर धरीं जी असा
अन् साथ करी राजसा–सरकली जवळ जरा नाचरी
घेतला सखूचा मुका
हं–कुणास सांगूं नका
हालली जराशी मका–उडाली वाऱ्यावर बावरी
गरगरा फिरे भिंगरी–जशी–गरगरा फिरे भिंगरी !

—ना. घ. देशपांडे

# गुजगोष्टि करूं कानांत—

कुणि नाहि हतं रानांत । गुजगोष्टि करूं कानांत.

गेल्याति बाबा गावांत । घावलीय् येळ निवांत
है पिठुळ चांदणी रात । व्हात्या वारं जोरांत
सुटलाय गारवा जरा
हंबर्तो बैल माजरा
मोटेचं पाणि झर्झरा
चालले कसं वाफ्यांत । गुजगोष्टि करूं कानांत.

त्यो तुझा काळसर रंग । करतोय माझं मन दंग
विहिरिचं काळसर पाणी । लागतं साखरंवाणी
तस गूण तुझं लै गोड । जाशि कल्मि अंब्याची फोड
रंगांत गोरि गोमटी
पर काळजाचि ऊलटी
नग नार अशी छाकटी
तूं मला प्यार समूधांत । गुजगोष्टि करूं कानांत.

—कुमार कमलाग्रज

# गरिबीचा सौंसार-

( चाल :— तूं टाक चिरुन ही मान )

चल व्हतीस का तैयार ? – करू सौंसार.
ही औट बिघ्यांची शेती
जरि भरति न कणग्या–पोती
तरि अपुल्या पोटापुरती
बघ जुमिन कशी ही काजळापरी दिसती काळीशार
चरतात बैल हे चाऱ्ही
कामाला अवखळ भारी
घे बघुन गुरँ ही सारी
तू सांजसकाळी काढित जा गँ या पवळीची धार
हे माझे झाप कुडाचे
वर छप्पर सरमाडाचे
कवडसे पडति दिवसाचे
पर यांतच येती झोप सुखाची, हे माझँ घरदार
ही मडक्यांची उतरंड
तिन दगडांचे चुलखंड
सौंसार नीट हा मांड
मग तुझ्या हातच्या सैपाकाला झकास चव येणार

झोपण्यास खाट न मजला
ही वाकळ हतरायाला
काही न पांघरायाला
पर घट्ट मिठीच्या उबाऱ्यामधी हीव कसं शिरणार ?
हौस तुझी पुरवायाला
करिन मी जिवाचा काला
द्यायचो न तकलिफ तुजला
या दणगट माझ्या छातीवर तूं टाक रेलुनी भार
मी भणंग न्हाई अगदी
धनदौलत माझी नगदी
घेतलीस पाहुन समदी
मग हुकुम द्यायला मालकीण तू सांग कवा होणार ?

—ग. ल. ठोकळ

---

## कोळ्याचें गाणें--

आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर,
होडीला देइ ना ठरूं
ग सजणे, होडीला वघतो धरूं !
हिरवं हिरवं पाचूवाणी जळ,
सफेत् फेसाचि वर् खळबळ,
माशावाणी काळ्जाची तळ्मळ
माझि होडी समिंदर, ओढी खालीवर,
पाण्यावर् देइ ना ठरूं,
ग सजणे, होडीला वघतो धरूं !

तांबड् फुटे आभाळान्तरीं
रक्तावाणी चमक् पाण्यावरी;
तुझ्या गालावर तसं काइ तरी !
झाला खुळा समिंदर, नाजूक होडिवर,
लाटांचा धिंगा सुरू,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

सूर्यनारायण हंसतो वरी,
सोनं पिकलं दाहिदिशान्तरीं,
आणि माझ्याहि नवख्या उरीं !
आला हांसत् समिंदर, डुलत फेसावर,
होडिशीं गोष्टी करूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

गोऱ्या भाळीं तुझ्या लाल् चिरी,
हिरव्या साडीला लाल्भडक् धारी;
उरीं कसली ग, गोड शिरशिरी ?
खुशी झाला समिंदर, त्याच्या उरावर,
चाले होडी भुरुभुरू,
ग सजणे, वाऱ्यावर् जणुं पांखरूं !

—अनंत काणेकर

## लक्ष्मी—

हें गच्च दाटलं पीक वावरामधीं
फुलवरा असा कणसांना तरतरला नव्हता कधीं
हंतरली भुइवर जशी हरळ लसलशी
जोगुनी डुबकण्या घेती खाचरांत गाईह्मशी
लागला फुटूं जोसांत गहूं हरभरा
हा मुबलक दाणागोटा सरणार न वरसाभरा
करवालिचा धरुनी हात मारगेसरीं
चढलीस घराची माझ्या तूं प्रेमानं पायरी
उंबऱ्यावरी तूं पाय टाकल्यावर
साजरं गोजरं सारं लागलं दिसाया घर
उतरला जवा विहिरींत तुझा पोहरा
लगि तुडुंब भरलं पाणी, लागतो निमा कासरा
शेतांत हळदिचा हात खपूं लागला
लागलीच त्यांना आली सोन्याची पिवळी कळा
मातींत तुझ्या अंगचीं टिपं ठिबकलीं
ही कणसं बघ मोत्यांच्या ओझ्यानं भारावलीं
तूं आल्यापुन काइबी न पडलं कमी
संपलं दाळिंदर माझं, उतरली घरीं लक्ष्मी !

—ग. ल. ठोकळ

## कारभारणीस--

तूं माजि मखमल, मी तुजा कळा
दारांत पिकवूं अळवाचा मळा;
तूं माजि जाय ग, मी सोन-केवडा
शेंगीं वथंबलाय् श्रावन्-घेवडा;
मी तुजा अनंत, तूं माजि तगर
सारा दिस शिंपू पोफळिचें आगर;
तूं माजि कर्दळ, मी तुजा साग
जतं ततं उभवुं गं नारलिची बाग;
कळा मळा, केवडा घेवडा, तगर आगर, साग साग-
जतं ततं उभवुं गं नारलिची बाग.

—आनंद

---

## शीळ--

रानारानांत गेली बाई शीळ
रानारानांत गेली बाई शीळ
तुला राया काळवेळ नाहीं
तुला राया ताळमेळ नाहीं
थोर राया तुझं रे कुळशीळ;
येड्यावानी फिरे रानोवना
जसा कांहीं ग मोहन कान्हा
हासे जसा ग राम घननीळ;

## सुगी

वाहे झरा झुळूझुळु वाणी
अन् वाऱ्याची गोड गोड गाणीं
तिथें राया उभा रे असशील;
तिथं रायाचें पिकले मळे
वर आकाश शोभे निळे
शरदाच्या ढगाची त्याला झील;
गेले धाऊन सोडुन सुगी
दूर राहून राहिले उगी
शोभे रायाच्या गालावर तीळ;
रानीं राया जसा फुलावाणी
रानीं फुलॅन मी फुलराणी
मधु सुवास रानीं भरतील;
फिरूं गळ्यांत घालून गळा
मग घुमॅव मोहन शिळा
रानीं कोकीळ सूर धरतील.

—ना. घ. देशपांडे.

---

**विनवणी—**

रागारागानॅ जाउ नको दूर
रागारागानॅ जाउ नको दूर
पानी पाटाचॅ वाहे झुळ्झुळा
नेइ संगाती पानपाचोळा
फिरे वारींत परी चौफेर;

## शंकरलाल अगरवाल

फळ भारानें तरु वाकले
मैना राघुशीं हळु हळु बोले
अलगुजाचा तूंहि धर सूर;
चल पल्याड इहिरीवरी
करूं दुपारची न्याहरी
झाला उशीर किति, मागें फीर;
दोघें मिळून म्हणु लावनी
मग फुलांस येचुन झनी
आळीपाळीनें गुफु गडे हार;
आंबेराईंत जावुन बसूं
जरा गालांत गुलगुल्ल हसूं
आतां शपत नाहीं रुसनार !
डावपेचानें कसें बोलावें
राया मुळी न मजला ठावें
साधीभोळी मी आंत बाहेर;
परी मधेंच देउन दगा
जाउ नकोस तूं जिवलगा
नको छळुन घेउ खुळी पोर;
आला इनंति करुनी शीन
जळे आशेचा दिवा मिन्‌मीन
उभा आसुंचा डोळ्यां मधि पूर.

—शंकरलाल अगरवाल

## सुगी

रावणी--

पलटून येशिल् कवा-
बोल ना रं माज्या जिवा ?
तुज्याबिगर ना गमे
मन कोनाशीं ना जमे
केला नाराजी कायेला ?-
मशीं धरीला अबोला ?
मीनं काये केली चूक ?-
म्हून मिटलं तूं मुख !
गुलाबाच्या फुलावानी
कोमाईले गाल दोनी !
जाल्या लालट तांबड्या
गुंजेवानी नाकपुड्या
नजरेला माज्यापून-
घेसि चोरून काहून ?
हात लावितां अंगाला
देसी ढकलून मला,
घाल छातीमदी भाला
चीर कोयत्यानं गळा
पर नगं नगं कवा
धरूं ह्यो असा रुसवा.

—भवानीशंकर श्री. पंडित

## जात्यावरलं गाणं--

झुंजूमुंजू झालं सुकदेव वर आला
पहा'टचं वारं कसं झोंबतं अंगाला
परसांत माझ्या आरवतंय कोंबडं
लई वक्त झाला आता फुटंल तांबडं
केधुळ वढतंय बाई जातं घरघर
पारुसं ग काम माझं पळड घरभर
देवळींत जळे पणती ग मिणमीण
भळभळ गळे पीठ कसं जात्यांतून
अवंदाचं साल न्हाई आलं पीकपाणी
दूरदेशीं गेला बाई माझा घरधनी
दूरदेशीं गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येचा जीव लावायाला कोन
राया डोळ्यामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
तुझ्या डोईवर अशी पागूट कुसुंबी
तुझं वठ बाई जशी फुलली डाळिंबी
राया तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठीं मला जनू भरलया खूळ
तुझ्याबिगर रे मला घासही जाईना
तुझ्याबिगर रे मला पाणीही घोटना

## सुगी

तुला आवडतो हुळा भुजून ठीवला
कसं करुं बाई, सम्दा वाळून चालला
कवाशिक याल माझ्या कुडींतल्या जीवा !
कवाशिक याल माझ्या देवाच्याबी देवा !

—ग ल. ठोकळ.

---

## आठवण—

ही तुझीच कांबळ म्हणुन आवडे भारी
मी वारिन राया तिजवर दुनिया सारी;
तूं दिली मला राजसा फुलं तगरीची
अनमोल असे ती दौलत माझ्या घरची;
तूं इथं बैसला—इथं चारिल्या गाई
नित वनामधी या दिसे नवी नवलाई;
तूं याच ठिकाणीं वाजविला कधि पावा
मी गवळण राधा, तूं गोपाळ दिसावा !
जरि तुला लोटलं दैवानं लइ दूर
नित आठवणींनीं भरून येतो ऊर !

—श्री. शांतादेवी परदेशी.

---

## रामपहारीं—

तूं सोबत येशी चंद्रा माझ्या मागं
भयभीत अशी मी कोणिच नाहीं जागं!

हे पाठीमागं तुझंच हसरं बिंब
अन् समोर माझी दिसे साउली लांब
बघ समोर गाई उभ्या गावकोसांत
हे ढवळे ढवळे ढग वरते हसतात
या रामापहारीं गारच वाहे वारा
वर फुटका हारा, पाझरते जलधारा
मी अधीर झाले घरीं निघाले जाया
ही शिणेल वाया, कोमल माझी काया
हें माघामधलें हीव थरारे अंग
हुरहूर वाटते कुणीच नाहीं संगं
पण हससी कां रे?—मनांत आलं पाप?
मी नवती नारी, भरे मनीं थरकाप

—अन् कशास येशी चंद्रा माझ्या मागं
भयभीत अशी मी कोणिच नाहीं जागं!

—ना. घ. देशपांडे.

## घरधनी–

झांजड पडली, दिवस चालला घराकडं परतुनी
येईना अजुन कसा घरधनी ?

वावरातलं दिलं [1]माळवं काढुन पाटीभर
घेउनी गेला डोईवर

वर चढला होता दिवस कासराभर
गेलाय् खाउनी तसा शिळी भाकर
माळवं आपलं वपुन टाकल्यावर

येइल त्याची आठ दिसांची मिठमिरची घेउनी;
येइना अजुन कसा घरधनी ?

काम टाकलं उरकुन सारं दोनपार पोतुर
खायला उठलं नंतर घर

या जोगुन आल्या गाई रानांतुन
ढळटळीत झाली बघा दिवेलागण
केधूळ उभी मी राहूं खोळुंबुन ?

बाजाराचे लोक घरोघर आले ना परतुनी;
येइना अजुन कसा घरधनी ?

---

१ भाजीपाला.

पां. श्रा. गोरे.

डोईवरती वझें घेउनी लांब जायचें किती
ऊन वर, फुंफाटा खालती

येईल घरधनी भुकेजून तेथुन
जेवण्यास त्याला दुधभाकर वाढिन
मग देइन कांबळ खाटेवर टाकुन

दूर करिन मी शीण तिकडचा हातपाय चेपुनी;
येइना अजुन कसा घरधनी ?

—ग. ल. ठोकळ

---

## खोळंबा--

पावसाची पिरपीर
अंधार ग काळाभोर
वीज लवे खालवर
सखा माझा कोठे दूर !

येण्याचा वखत रोज
टळे बाई ! नाहीं खोज[1]
जीव नाही थारीं बघूं
कोण्या वनीं माझा राघू ?

---

1 पत्ता.

## सुगी

सख्याकडे डोळे कान
धुंडु कशी परी रान
ठेवुं घरीं कोणापाशी
लेकरू हें तान्हीमाशी !

मरी आई माये ! धांव
ठेव सुखी महादेव[2]
लागते मी पायापाटीं
तुझी भरीन ग ओटी !

* * *

हृदयांत हुरहूर
दाटुनिया आला ऊर
वाटेकडे एकतार[3]
दोन्ही डोळां लागे धार !

—पांडुरंग श्रावण गोरे

---

२ घरधनी. ३ एकसारखें.

## न्याहारीचें गाणें—

न्यारिचा वकुत व्होईल . मैतरणी बिगीबिगी चाल
नांगूरसुटीच्या आत पोचाया होवं तवं
सोडितिल हात बैलाला धुंडील नदर कोनाला

नदरे न पडन् मी जरी
जाईल मर्जि ग तरी
उरिं रुतंल माझ्या सुरी

नग नग गमावूं येळ मैतरणी बिगीबिगी चाल.

लइ वाडुळ जुपि झाल्याली असल्याल समदि शिणल्याली
शिण जाइल न्यारि करून अन् सांग कुना देखुन
त्ये खुलं तोंड घामानं भरघोसहि कणसाहुन

पाहिलं जरी रोज मी
तरि हौस न होई कमी
फिरफिरुन पगायास मी

व्होतसे मनि उतायीळ मैतरणी बिगिबिगि चाल.

—यशवंत.

# लवतेया लव लव ईज !—

डोङ्गराआड लइ तेज लवतेया लव लव ईज !
ह्यो आलें समदं अभारं किति बापा ! कारं कारं !
मादला गुडुप अन्धार ! अक्षीच थामलें वारं !

म्होरं न दिसं काइभी
ह्यो मुकाट झारं उभीं
मज ह्याचं लागूनि भी—

थरकांप करतं काळीज ! लवतेया लव लव ईज !

गड्गडतं भरदल्यावानी ! मुसलधार पडतं पानी !
नाय् संगं सोबुत कोनी ! येकलीच पडली रानीं !
ते फिरतां खेतिवरून खान्याचं रान्धिल कोन !

पोंह्चन कदी मी घरा !
भेटंनश्यान लेंकुरा !
हाय् तुलाच परमेसरा !—

गरिबाची माझी लाज. लवतेया लव लव ईज !

—भवानीशंकर श्री० पण्डित.

“ लइ मानस अमुचा, द्यावी   आपल्या घरीं ही पोर
पर शङ्का येउन कांहीं   घेतें हें मन माघार !
पोरिला हौस मोत्यांची   ती तुम्ही कशी पुरवाल ?
हा हेत पडावी की ती   ज्या घरीं माणकं लाल.
बोलतों
असूं द्या माफि
करा दिलसाफि
असावें चोख
व्यवहार तरी बिनधोक ! ”

“ ठेवतां न पोटीं किन्तु   पुसलेंत–लई आवडलें !
धनदौलत ध्या देखून   कांहींच नाहिं लपलेलें
पडवीला कणगी पोतीं   मोतीं त्यांमधि बिनमोल
दावणीस गायी बैल   त्ये अम्हां हिरे अन् लाल.
दरसाल
पिकें येतात
खाण शेतांत
तीच सोन्याची ”
बसलीच गांठ जन्माची.

––यशवंत.

---

# पाटलाची सून-

( चालः—या बाइ जेजुरि नगरांत. )

पाटलाची व्हनार ही सून -- पगा शोक इचा एव्हापून;
व्हायचं जेठोड्यांत लगीन
काय मुर्कायचं आतांपून
बाइच कशापायीं शीण
मंजूळे ग - जाऊं नगं - धरा बाइ तिला हो थाम्बून;
पाटलाघरचं त्ये बासण
काय पगावं त्यांचं घेणं
चोपडि चिरडी अंगभरून
राधेवानी - नाजुक रानी - दीसल लईच खुलून;
साखळ्या, वाकी, नथ, मोहोर
सरी गाठलं - लइ शिणगार
लेउन वाकुन जाइल नार
समद्याजणी - मैतरीणी - करवल्या इच्या ग आपन.
नाईं कोनी हांसायाचं
नाईं कोनी चिडवायाचं
नांव घेउद्या मानसाचं
'शिरपतराव'-लइ गोड नांव-घे पगु आहाणा बाढून !

—अशोक.

## मागणी--

[ ' ऐराणी भाषा ' ही पूर्व व पश्चिम खानदेश, नाशिक जिल्ह्यांतील कळवाणें, मालेगांव, बागलाण इत्यादि, व मोगलाईतील कन्नड या भागांतून प्रचलीत आहे. प्रस्तुतची कविता अस्सल ऐराणी भाषेंतली असून तींत पाटलाच्या तारा नांवाच्या मुलीस मागणी आलेली आहे व तारा आलेल्या स्थळीं द्यावी कीं न द्यावी या बाबतींत पाटील पाटलीणबाईचा सल्ला घेत आहेत. ]

मांगनं उनं आजलें,
        सांग मंग् देस अठ्यें तारिले ?

से घरना मोठा, सुखी खाइपीसन
नहिं देनंलेनं डोकावर मनमन
से नवाजेल या भर तालुकामन
        ' पडनार वान नाहिं राइ ' ह्मने ' बाबिले ';

घर कडीपाटनं, वर चुनगच्ची जिना
हे न्हातं घर, अन् सेतस गोठा पुना
से वतनदार पाटील, म्हने काळिना
        नहिं छाती कोनी नांव ठिई कूळले;

---

उनं–आले, अठ्यें–इथें, तारिले–ताराबाईला, से–आहे, मनमन–पुष्कळ, नवाजेल–नावाजलेला, राइ–राईभर, बाबिले–मुलीला, काळिना–मुलकी.

से गांवकूसलें हेरमळा न्यामिना।
चालतीस मोठा रोज तिन्ही सांजना।
या सालें लावा म्हने बाग केळिना।
        घरबसलें चाली उना सगा आपले;
बहु आलोखीना उना कधीं पाऽहुना।
नहिं निघू देस तो त्येले चाहाविना।
है बरं सगपन येस ध्यानमन मना।
        जर पटत हुई हा सल्ला मनमा तुले;
आंडोर एकला पुना सात नवसना।
से देखलपनमा गोरासा तोण्डना।
इरपीनसारखा उचासा हाडना।
        आतेसें चमकस मिसुर जसा ओठले;
वग नासिबभागले भेटनीच चांगनी।
ऽव, पोर नांव ली जऽहयूतऽहयू आपनी।
जर उपटाई खडकले कधीं धडकनी।
        ती अक्षी आपना रडी मंग् नांवले.

—सुरेश

न्यामिना—नामी, आलोखीना—अदारातिथ्याचा, त्येले—त्याला, तुले—तुला, आंडोर—मुलगा, देखलपनमा—दिसण्यांत, इरपीन—युरोपियन, आतेसें—आतांशी कुठं, जसा—जराशा, वग—स्थळ, नसिबभागले—नशिबानें, चांगनी—चांगली, ऽव—अग, आपनी—आपली, ली—घेईल, उपटाई—आपटाई, नांवले—नांवाला.

## पायगुणी--

छळतात येथ मजला म्हणुनी
" जल्मली कशा ही पायगुणी ? "

गत वरुषीच्या मार्गीष्यांत
लगीन झालें या दिवसांत
आठव सारा भरुन मनांत
येतसे हृदय माझें भरुनी !
दारीं अंब्याच्याच डहाळ्या
मांडवावरी अजुनि न सुकल्या
शुभशकुनाच्या छेः त्या कुठल्या !
लावल्या मुहूर्ती मज बघुनी ?
संसाराचें सुख देखाया
आतुर मन हें झालें त्याला
भोग कसा पर ये नशिबाला
संसार संपला हा म्हणुनी !
कपाळ म्हणती स्मशान कोणी
दूर लोटिती, झिडकारि कुणी
निंदुनि सारे मजसि पाहुनी
छळतात येथ मजला म्हणुनीः—

" फांदि फांदिला मोहर आला
आंबराइला मोहर भरला

## सुगी

पीक पाहुनी जीव तोषला !
झडलाच हाय तो हिज बघुनी !
विहिरीचें बी पाणि आटलें
सुरुंग लावुनि कितिक फोडलें
गंगेपरि ते पाणी पहिलें
अटलाच झरा तो हिज बघुनी !
रास कशाची धान्य न पिकलें
शेत पेवही उघडें पडलें
नशिबानें परि वैर साधलें
मळणीस पायगुण ही म्हणुनी ! ”

सुख द्याया हें रान जिवाचें
केलें काटेरान सुखाचें
परी कुणाला मोल जिवाचें
गेलाच सुखाचा हाय धनी !
सख्या ! कशा मज एकटि टाकुन
आणभाक ती जीवा देउन
जीव वाहिला मलाच बोलुन
टाकून मला गेला निघुनी !

—फकीर

## भडिमार–

[ हणमंत पाटलानें आपला एकुलता एक मुलगा हैबती यास आजच पहिल्यानें शाळा चुकवुन शेतराखणीस पाठविलें होतें. हणमंता रातपाळीला स्वत: जाणारच होता. पण हैबतीला संध्याकाळीं परत येण्यास थोडा उशीर झाला तेवढ्यांत बिघडलें ! शेत अर्धा मैल लांब, हैबतीचें वय चवदा वर्षे, आणि हणमंताची 'कारबारीन' श्रीमंताची लेक, इतक्या गोष्टी ध्यानांत ठेऊन कविता वाचावी. ]

लइ झालि वाडुळ कवाचि–अशिच उबि वाट पाहत्ये
ढोर गुरूं, परतलं बि घरा–दिसना कसा अजुनशान हैबती
हटकून आनिल कुनी बि–म्हनन तरि प्वार येकलं
शात कुनिकड तरी पडलं–सुचली कशी अवदसा तुमासनी
तुमची कवाबि आशि घाइ–लगबगींत ताट लोटलं
प्वार गडबाडिमदीं उठलं–तुमच्या न धाड पडु राकनोस त्या
लुटिनात च्वार तकडं नि–कितिबि बसनात भोरड्या
न्येतिल समदि बि असं कितिसं–कुरवान त्ये करिन राजसावरी
असत्याल वापइ जगांत–नसल परकार ह्यो कुटं
पाडस करिलजि उन्हांत कसं–उलव्यानि काय म्हनु काळजास ह्या

अन त्येचि साळ चुकवून–इवजुन मशागतीकडं
गाडव बनवुन ठिवाल किंजी–बुद काय ही म्हनु बिगाडली तरी.

—साधुदास

---

नजर--

कोनाचि रे देवबापा इशारि नदर
लागुनश्यानि झाल्या चिमणं घाबरं
मिठमोहऱ्यांनि अतां दिरिष्ट काढीली
आणुनिया माति तिवइटाचि लावीली
अम्बाबाइ रोडगा मि अवन्दा वाहीन
सप्तशिङ्गि भाउलिला देईल दावण
सटवाइ तुला दिलं खेळणं पाळणं
माझ्या सोनुल्याचि करि अक्षी तूं राखण
सातपिर बाबा तुझ्या करीन खेव्या मी
वसरीला येउन्श्यानी पडंल तूझ्या मी
मामाच्याबी नांवाचा त्या अङ्गारा लावीला
कुशि आला कवतुक करून ध्यायाला
कोनि नका बोलुं, इठं डचकतं सोनं
डचक्‌दिवा काढायाला कोनी या धावून
देवा तूशि किर्पा, बाळ ओटींत घातलं
आतां तुझ्याबिगर या कोन रे राखील ?

—अशोक.

---

संपलें !

कवि " किशोर " यांचा अभिनव कविता-संग्रह

# मधु--मालती

पृष्ठ संख्या १००, अँटिक कागद, मजबूत बांधणी, मनोहर रॅपर

**किं. १ रुपया ट. ख. निराळा**

एकच मत:—

केसरी:— " किशोर यांनीं लावलेल्या 'मधुमालती' वर निसर्गप्रेमाची मंजरी डवरलेली आहे. कल्पना विलासाचा सुवास तर-( पानापानांतून ) पर्णापर्णातून दरवळलेला आहे. अशा किती तरी कविता दाखवितां येतील कीं, त्यांत कोठे मनोहर रूपक, कोठें नाजूक विनोदाची कुजबूज, कोठें मोहक उपमा, तर कोठे गूढ विडंबन रसिकांच्या मनाला खुलवील ......'शशांक' 'उल्कापात' 'जाडा पंडित' 'दिव्य भेट' 'रजनी' 'निष्प्रेम जीवन' 'कागदी गुलाब' 'कापसाचे शेत' इत्यादि कविता कल्पनाविलास, विनोद, विडंबन इत्यादि काव्यगुणांनीं वाचनीय व रम्य झाल्या आहेत. 'अत्यंजाचें गाणें' या गाण्यानें प्रत्येक वाचकाच्या अंत:करणांतील तंतू अस्पृश्यतेच्या स्मृतीनें स्पंदन पावल्याशिवाय राहणार नाहींत. "

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

१ दासराम बुकडेपो. महाद्वार, कोल्हापुर
२ परचुरे पुराणिक आणि मंडळी, मुंबई
३ महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, पुणें.

* बडोद्यांतील लोकप्रिय नियतकालिक *

लघुकथा, लघुनिबंध, चरित्रें, प्रवासवर्णनें, मजेदार माहिती,
टिकात्मक लेख ह्यांचा भरणा असलेले महिन्यांतून
१, ११ आणि २१ तारखेला प्रसिद्ध होणारे

# कप्तान

## वाचा आणि वर्गणीदार व्हा

उत्तमोत्तम मजकूर आणि सुंदर चित्रांनीं युक्त 'कप्तान' असून
वा. वर्गणी फक्त ३ रु. बडोद्यास २ रु.

**नमुना अंक आजच मागवा**

व्यवस्थापक
**" कप्तान "**
कप्तानकार्यालय, बडोदें.

REFBK-0019893